पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

• वर्ष १६ • अंक ७२ • गुरूवार, दि.१७ सप्टेंबर २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com


## »थोडक्यात

### पुण्यात ‘एफडीए’ची मोठी कारवाई!

**पुणे** : पुण्यात अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. एफडीएने १२ आस्थापनांवर छापे टाकत ५६ लाखांचा अन्नसाठा जप्त केला आहे. ऐन सणासुदीच्या काळात करण्यात आलेल्या कारवाईमुळे शहरात खळबळ उडाली आहे. तर प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या साठ्याप्रकरणी १४ ठिकाणी कारवाई करून सुमारे २० लाख २६ हजार रुपयांचा साठा एफडीएने जप्त केला आहे.

### १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावण्याचा मार्ग मोकळा!

**वॉशिंग्टन** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना भारतावर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अमेरिकेच्या संसदेचे कनिष्ठ सभागृह असलेल्या प्रतिनिधी सभेने रशियाकडून सर्वाधिक तेल खरेदी करणाऱ्या पाच देशांवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावण्याचे विधेयक मंजूर केले. या विधेयकाच्या बाजूने २६२ आणि विरोधात १५९ मते पडली. हे विधेयक आता व्हाईट हाऊसकडे जाईल. ट्रम्प यांच्या स्वाक्षरीनंतर त्याचे कायद्यात रूपांतर होईल.

### आणखी ५१ लाख कर्मचाऱ्यांना पीएफचा लाभ!

**नवी दिल्ली** : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या (ईपीएफओ) अनिवार्य सदस्यत्वासाठीची वेतनमर्यादा १५ हजार रुपयांवरून २५ हजार रुपये प्रतिमहिना करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी हा निर्णय घेण्यात आला. या बदलामुळे सुमारे ५१ लाख अतिरिक्त कर्मचारी ईपीएफओच्या कक्षेत येतील. माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रपरिषदेत या निर्णयाची माहिती दिली. सामाजिक सुरक्षा व्यवस्थेचा विस्तार करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

# भंगार, बंद हॉटमिक्स प्लांटच्या जोरावर कोटींची कंत्राटे





■G.H. Khandelwal एजन्सीचा काळाबाजार उघड

■यंत्रणेच्या डोळ्यात धूळ, बनावट प्रमाणपत्रांचा खेळ



प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अकोला** :सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD), अकोला विभागाच्या कारभारावर आता गंभीर आणि संतप्त प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

कागदोपत्री सर्वकाही चोख असल्याचा आव आणणाऱ्या यंत्रणेच्या नाकाखाली अकोल्यात एक मोठा भ्रष्टाचार सुरू असल्याचा संशय बळावला आहे. M/s G.H. Khandelwal या एजन्सीने निविदा प्रक्रियेत बाजी मारण्यासाठी चक्क 'बंद पडलेला हॉटमिक्स प्लांट' कार्यरत असल्याचे भासवून खोटी आणि बनावट कागदपत्रे जोडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. एका बाजूला रस्ते विकासाच्या नावाखाली जनतेच्या करातून गोळा झालेला पैसा लाटायचा आणि दुसऱ्या बाजूला अधिकाऱ्यांच्या साठमारीने भ्रष्टाचाराचा बकासुर पोसायचा, असा हा लाजिरवाणा प्रकार अकोल्यात सुरू आहे !.

### काय आहे हा भ्रष्टाचाराचा खेळ?

मिळालेल्या अत्यंत खळबळजनक माहितीनुसार, M/s G.H. Khandelwal एजन्सीने ज्या हॉटमिक्स प्लांटचा दाखला सादर करून निविदा पटकावण्याचा घाट घातला आहे, तो प्लांट प्रत्यक्षात धूळ खात पडला असून गेल्या अनेक माहिन्या पासून पूर्णपणे बंद आहे. साधी चूलही पेटणार नाही अशा या ओस पडलेल्या आणि बंद असलेल्या कारखान्याला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 'यांत्रिकी विभागाकडून' जिवंत आणि चालू असल्याचा दाखला कसा मिळाला? हा संशोधनाचा नाही, तर थेट सीआयडी चौकशीचा विषय बनला आहे. कागदावर प्लांट चालू दाखवून जनतेच्या आणि शासनाच्या डोळ्यात लीलया धूळ फेकण्याचे धाडस या एजन्सीने केले कसे ? प्लांट तर बंद आहेच पण या ठिकाणी इलेक्ट्रिक सप्लाय आणि जनरेटर सुविधा देखील नाही.

### अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर गंभीर संशय

जर प्रत्यक्ष ग्राउंडवर प्लांट बंद अवस्थेत आहे, तर तो कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र देणारे अधिकारी गाढ झोपेत होते का ? की या सगळ्या काळ्या धंद्यामागे अकोल्यातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांची अभय आहे ? प्रमाणपत्र देताना संबंधित अधिकाऱ्यांनी जागेवर जाऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी का केली नाही? प्लांटचे जीपीएस (GPS) लोकेशन, मशीनरीची सद्यस्थिती, उत्पादन क्षमता, वीज बिल, किंवा कामगारांच्या नोंदी तपासण्याचे साधे सौजन्यही या अधिकाऱ्यांनी दाखवले नाही का ? याचा सरळ अर्थ एकच होतो – एजन्सी आणि संबंधित अधिकारी यांच्यात संगनमत झाले असून, लाचखोरीच्या जोरावर हा कागदी बनाव रचण्यात आला आहे. शासनाच्या नियमांची पायमल्ली करून बोगस प्रमाणपत्रांच्या आधारावर शासकीय कंत्राटे लाटणाऱ्या या टोळीने प्रशासकीय व्यवस्थेची पार माती केली आहे.

### कठोर कारवाईची तीव्र मागणी

हा केवळ प्रशासकीय हलगर्जीपणा नसून, थेट शासनाची फसवणूक आणि कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याचा गंभीर प्रकार आहे. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी झालीच पाहिजे. ज्या अधिकाऱ्यांनी डोळे झाकून बंद प्लांटचे कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र दिले, त्या प्रत्येकाला बडतर्फ करून त्यांच्या संपत्तीची चौकशी झाली पाहिजे. M/s G.H. Khandelwal एजन्सीची निविदा तात्काळ रद्द करून त्यांना काळ्या यादीत (Blacklist) टाकण्यात यावे. जर या प्रकरणात दोषींवर तात्काळ कठोर कारवाई झाली नाही, तर हा भ्रष्टाचार चाललेला खेळ सुरू राहिल, हे ओळखून तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा आता नागरिक आणि जाणकारांकडून दिला जात आहे. शासकीय यंत्रणा आता या भ्रष्टाचाऱ्यांवर काय पावले उचलते, याकडे संपूर्ण अकोला जिल्ह्याचे डोळे लागले आहेत.

# मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडले!

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**बीड** : मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटीहून मुंबईच्या दिशेने निघालेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरूवार, १७ सप्टेंबरला पहाटे २० दिवसांपासून सुरू असलेले उपोषण सोडले. सरकारच्या शिष्टमंडळाने बीडमधील पाटोदा येथे मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत त्यांची मनधरणी केली. मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री दादा भुसे, आ. सुरेश धस, आ. प्रसाद लाड आणि बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सकाळी मनोज जरांगे पाटील यांच्याशी संवाद साधला. यानंतर गुरूवारी सकाळी ६ वाजता पत्रकार परिषद घेऊन उपोषण सोडल्याची घोषणा करण्यात आली. मुंबईत गेलेल्या आंदोलकांनी परत यावे, असेही आवाहन त्यांनी केले.

सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या मागण्या पूर्ण कराव्यात, यासाठी सरकारला तीन महिन्यांचा वेळ दिला. या काळात मागण्या पूर्ण न केल्यास आम्ही मुंबई गाठणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. उपोषण आज स्थगित करत असलो तरी आंदोलन सुरूच राहणार, असेही मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. पुढे ते आपल्या समर्थकांना आवाहन करताना म्हणाले, तीन वर्षांपासून आपण आरक्षणासाठी लढत आहोत. आता सरकारला आणखी तीन महिने देऊ.



### १३ पैकी १२ मागण्या मान्य केल्या - मुख्यमंत्री फडणवीस

मनोज जरांगेंनी उपोषण स्थगित केल्याचा मला आनंद आहे. त्यांच्या १३ मागण्यांपैकी १२ मागण्या आम्ही मान्य केल्या होत्या. एका मागणीबाबत आम्ही त्यांना कायदेशीर अडचणी सांगितल्या होत्या. त्यामुळे आम्ही ज्या मागण्या मान्य केल्या आहेत, समितीने जे काही आश्वसनं दिली आहेत, ते सर्व आम्ही पूर्ण करु. सरकार नेहमीच सकारात्मक राहिलंय. आमचे दरवाजे नेहमी उघडे आहेत, असेही देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

## मनोज जरांगे यांनी पुन्हा समाजाचा विश्वासघात केला!

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**छ. संभाजीनगर** : मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेतल्यावर ओबीसी नेते मंगेश ससाने यांनी त्यांच्यावर टीका केली आहे. ‘मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा समाजाचा विश्वासघात केला असून, रात्रीच्या अंधारात सरकारसोबत साटेलोटे करून मोठी सेटलमेंट केली आहे,’ असा आरोप ससाने यांनी केला. मोठमोठ्या बाता मारणारे जरांगे आता अचानक मागे का हटले, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

## मराठवाड्याला दुष्काळमुक्त करणार-मुख्यमंत्री फडणवीस

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**छ. संभाजीनगर** : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्याला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त केला. यंदाच्या दुष्काळाच्या संकटात सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. शेतकऱ्यांच्या पीक नुकसानीचे पंचनामे लवकर पूर्ण करून मदत पोहोचवली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा मराठवाड्यातील लाखो शेतकऱ्यांना होत असलेला लाभ अधोरेखित केला. तसेच, शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांची जुनी वीज बिलं रद्द करण्याचा निर्णय आणि मोफत वीज पुरवठ्याची घोषणा केली. मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी कृष्णा आणि उल्हास खोऱ्यातून पाणी आणण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

## क्लासमेट हॉटेलमधील प्रत्यक्ष जुगाऱ्यांची संख्या किती?

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अकोला** : मलकापूर येथील येवता रोडवरील क्लासमेट हॉटेल व बार परिसरात खदान पोलिसांनी कथित अवैध जुगार अड्ड्यावर धाड टाकत २७ लाख ६२ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत पोलिसांनी कुणाल सुनिलकुमार मनवानी (२६), कुशल विमलकुमार कायना (२१), जतीन सुनिलकुमार मनवानी (१९), दीपक परमानंद सिदारा (४१), निशांत मेघराज बजाज (२४), राहुल दौलत चौथानी (२५), आशीष चंदुलाल जसवानी (२८), रोशन अनिलकुमार राजपाल (२४) आणि वंश महेशकुमार टकरानी (१७ वर्षे ६ महिने) यांच्यावर कारवाई केली आहे. तर सुमीत गुरबानी, पवन चेनानी, कौशिक प्रकाश शोधनानी, अमित बालचंदानी, जितेंद्र कमलकुमार खबरानी आणि विजय अहुजा हे सहा जण फरार असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.



### पहिल्याच कारवाईत प्रश्नचिन्ह?

खदान पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भाऊराव घुगे यांच्या पथकाने केलेल्या या कारवाईनंतर घटनास्थळी प्रत्यक्ष किती जण होते आणि किती जणांवर कारवाई झाली, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट करण्याची गरज व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणात पोलिसांनी नमूद केलेल्या आरोपींची संख्या, घटनास्थळावरील प्रत्यक्ष उपस्थिती आणि सीसीटीव्ही फुटेज यांची पडताळणी झाल्यास या कारवाईचे वस्तुनिष्ठ चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## प्रवीण हुंडीवाले यांच्या रक्षकाकडून हवेत गोळीबार!

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अकोला:** अकोला जिल्ह्यातील बोरगाव मंजू पोलीस स्टेशन हद्दीत एका वादातून कानशिवनी येथे हवेत गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रसिद्ध व्यावसायिक किसनराव हुंडीवाले यांचे चिरंजीव प्रवीण हुंडीवाले यांच्याकडे असलेल्या परवानाधारक (लायसन्ससी) रिवाल्वरमधून हवेत गोळीबार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, यास बोरगावमंजू पोलिसांनी पुष्टी केली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. या व्हायरल व्हिडिओमध्ये प्रवीण हुंडीवाले यांचे पोलीस गार्ड हे त्यांची सर्विस रिवाल्वर रोखताना दिसत





### काय आहे नेमके प्रकरण?

मिळालेल्या माहितीनुसार, कानशिवनी येथे दारू आणि सिगरेट पिण्याच्या कारणावरून एका ठिकाणी वाद निर्माण झाला होता. या वादाचे रूपांतर नंतर हाणामारी आणि राड्यामध्ये झाले. परिस्थिती बिघडत असल्याचे पाहून प्रवीण हुंडीवाले यांच्या सुरक्षेसाठी असलेल्या सुरक्षा रक्षकाने (गार्डने) जमावावर आपली सर्विस रिवाल्वर रोखल्याचे व्हिडिओमध्ये स्पष्ट दिसत आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### पोलिसांची संशयास्पद भूमिका आणि जनतेचा रोष

या संपूर्ण प्रकारानंतर बोरगाव मंजू पोलिसांनी सुरुवातीला गोळीबार झाल्याची प्राथमिक माहिती पुष्टी केली होती. मात्र, नंतर "बाकी काही नाही, तपास सुरू नाही" असे म्हणत पोलिसांनी हात वर केल्याचे बोलले जात आहे. यापूर्वी प्रवीण हुंडीवाले यांनी चिखलदरा येथे पर्यटकांना बंदूक दाखवत ओव्हरटेक केल्याची माहिती प्राप्त झाली आहे.अशाच प्रकरणाची पुनरावृत्ती अकोल्यात होत असून, उघडपणे बंदूक काढून शिवीगाळ व दहशत निर्माण करणाऱ्यांवर पोलीस कारवाई का करत नाहीत ? असा संतप्त सवाल सामान्य जनतेकडून विचारला जात आहे.

# न्यू तापडिया नगर रेल्वे उड्डाणपूल वादाच्या भोवऱ्यात

## उद्घाटनाआधीच चार खांब जमिनीत सरकले; हजारो नागरिकांचे स्वप्न धुळीस!

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अकोला:** शहरातील बहुचर्चित आणि अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या न्यू तापडिया नगर रेल्वे उड्डाणपुलाचा प्रकल्प पूर्ण होण्याआधीच मोठा भ्रष्टाचार आणि प्रशासकीय अनास्थेमुळे वादळात सापडला आहे. या उड्डाणपुलाचे पिल्लर क्रमांक १२, १३, १४ आणि १५ अचानक जमिनीत सरकल्याची (खाली बसल्याची) धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. यामुळे उद्घाटनाची प्रतीक्षा करणाऱ्या हजारो नागरिकांच्या स्वप्नांवर पाणी फेरले गेले असून, संपूर्ण परिसरात तीव्र संतापाची लाट पसरली आहे.



### प्रशासनाचा भ्रष्ट कारभार आणि निकृष्ट कामाची पोलखोल

गेल्या अनेक वर्षांपासून न्यू तापडिया नगरवासी या रेल्वे उड्डाणपुलाची आतुरतेने वाट पाहत होते. मात्र, प्रत्यक्षात कामाचा दर्जा किती निकृष्ट होता, हे या घसरलेल्या खांबांमुळे उघड झाले आहे. पुलाच्या रस्त्याला आधीच पडलेल्या भेगा लपवण्याचे असफल प्रयत्न प्रशासनाकडून केले जात होते. परंतु, आता थेट खांबच खचल्यामुळे या प्रकल्पातील मोठा भ्रष्टाचार चव्हाट्यावर आला आहे. जनतेच्या कष्टाच्या पैशांची अशी उघडउघड माती होत असतानाही संबंधित यंत्रणा मूग गिळून गप्प बसली आहे.

### आता प्रशासन कुणाच्या डोक्यावर खापर फोडणार?

नियोजनाचा बोजवारा उडाल्याचे या घटनेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. केवळ राजकीय फायद्यासाठी आणि ठेकेदारांच्या फायद्यासाठी निकृष्ट साहित्य वापरून जनतेच्या जीवाशी खेळ खेळण्यात आला आहे. आता हा प्रकल्प कायमचा बाधित होणार का? आणि या विनाशाची जबाबदारी स्वीकारून प्रशासन कुणाच्या डोक्यावर खापर फोडणार? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. जर या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त न्यू तापडिया नगरवासियांने दिला आहे.

### जमिनीचे भाव कोसळणार, नागरिक भयभीत

या उड्डाणपुलाच्या मार्गिकेवरच आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यामुळे न्यू तापडिया नगरचा हा परिसर धोक्याची घंटा ठरत आहे. पूल खचल्यामुळे या भागातील जमिनीचे भाव अक्षरशः कोसळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हजारो कुटुंबांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून, हा पूल नसून जणू मृत्यूचा सापळाच तयार करण्यात आला आहे, अशी तीव्र भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

## ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर!

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**मुंबई** : दरवर्षी, भारतीय चित्रपटसृष्टीतील अविस्मरणीय आणि उत्कृष्ट योगदानाबद्दल एका कलाकाराला दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित केले जाते. हा पुरस्कार भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान मानला जातो. ज्येष्ठ कन्नड चित्रपट अभिनेते अनंत नाग यांना २०२४ सालच्या या पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. भारत सरकारने या पुरस्कारासाठी ७८ वर्षीय अभिनेत्याच्या नावाची घोषणा केली आहे. भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत मुख्य नोडल एजन्सी असलेल्या प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोने आपल्या सोशल मीडियावर अनंत नाग यांचा एक फोटो शेअर केला आणि लिहिलं की, दादासाहेब फाळके पुरस्कार २०२४ श्री. अनंत नाग यांना प्रदान केला जाईल. त्यांनी अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली आहे. हा पुरस्कार २२ सप्टेंबर २०२६ रोजी गुजरातच्या केवडिया येथे ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात प्रदान केला जाईल.




सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा २
गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६
Web. http://epaper:citynewssuperfast.com

## बहुगुणी कडीपत्ता

कडीपत्ता ही स्वयंपाकातील अत्यंत उपयुक्त व सुगंधी वनस्पती असून औषधी दृष्ट्या देखील त्याचे महत्त्व खूप मोठे आहे. कडीपत्त्याचे औषधी गुणधर्म जाणून घेऊया.

१) पचनसंस्थेस लाभदायक : कडीपत्ता भूक वाढवतो, पचन सुधारतो. अपचन, गॅस, ॲसिडिटी कमी करण्यास मदत होते. यात फायटोकेमिकल्स व फायबर असल्याने मलावष्टंभ दूर होतो. २) रक्तातील साखर नियंत्रित ठेवतो : कडीपत्त्यातील कार्बाझोल अल्कॅलॉइड्स व ॲंटिऑक्सिडंट्स इन्सुलिनची कार्यक्षमता सुधारतात. मधुमेह असणाऱ्यांसाठी नियमित सेवन उपयोगी मानले जाते. ३) कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत होते : कडीपत्ता वाईट LDL कोलेस्टेरॉल कमी करून चांगले HDL वाढवण्यास मदत करतो. हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त. ४) यकृतासाठी (Liver) संरक्षक : कडीपत्त्याचे घटक यकृताला विषारी पदार्था पासून बचाव करतात. लिव्हर डीटॉक्स मध्ये सहाय्य करतात. ५) दाहरोधी गुण : सांधेदुखी, सूज, वेदना यावर कडीपत्त्यातील नैसर्गिक दाहरोधी घटक लाभदायक आहेत.

# आज गौराई माहेरवाशीण म्हणून येणार!



गणेशोत्सवाच्या धामधुमीत बाप्पााच्या पाठोपाठ माहेरवाशीण म्हणून येणाऱ्या लाडक्या गौराईच्या स्वागताची तयारी आता सुरू झाली आहे. सोन्याच्या पावलांनी येणाऱ्या महालक्ष्मीचे स्वागत करण्यासाठी रांगोळ्या, फुलांची आरास आणि पारंपरिक पद्धतीने तयारी केली जाते. पहिल्या दिवशी थाटामाटात गौराईचे स्वागत, दुसऱ्या दिवशी पूजन आणि भोजनाचा नैवेद्य आणि तिसऱ्या दिवशी मनावर दगड ठेवून प्रत्येक जण बाप्पासोबतच गौराईचेही विसर्जन करतात. शास्त्रानुसार, अनुराधा नक्षत्रावर आवाहन, ज्येष्ठ नक्षत्रावर पूजन आणि मूळ नक्षत्रावर विसर्जन करण्यात येतं. गौरी आवाहन गुरूवारी १७ सप्टेंबर रोजी अनुराधा नक्षत्रात करायचं आहे. त्यानुसार संध्याकाळी ७ वाजून ५२ मिनिटांपूर्वी गौरीचं आवाहन करणे अत्यंत शुभ मानले गेले आहे. त्यानंतर ज्येष्ठा नक्षत्र सुरू होणार आहे. दुसऱ्या दिवशी गौरी पूजन शुक्रवारी १८ सप्टेंबर या दिवशी ज्येष्ठ नक्षत्र दिवसभर असल्याने तुम्ही कधीही पूजा आणि नैवेद्य दाखवू शकता. तर गौरी विसर्जन शनिवार १९ सप्टेंबर या दिवशी मूळ नक्षत्रात सूर्योदयापासून दुपारी ३ वाजून १५ मिनिटांपर्यंत करायचं आहे.

### गौराईला घरात घेण्याची पद्धत

एका पाटावर ताट घेऊन त्यात एक किंवा दोन जशा गौरी तुम्ही बसवता, त्याप्रमाणे मुखवटे ठेवावेत. पाटाभोवती रांगोळी काढावी. आरतीचे ताट तयार ठेवावे. घरातील सुवासिनी महिलांनी मुखवट्याचे हळद-कुंकू, अक्षता वाहून औक्षण करून पूजा करावी. गौरीला यावेळी दूध-साखरेचा नैवेद्य दाखवावा. यावेळी तुळशीचेही पूजन करावे.

### गौरी घरात घेताना काय म्हटले जाते?

एकजण म्हणते गौरी आल्या कशाच्या पावली, मग दुसरी म्हणते धनधान्याच्या पावली, पुन्हा एकजण म्हणते गौरी आल्या कशाच्या पावली मग दुसरी म्हणते धनसंपदा सुखसमृद्धीच्या पावली, गौरी आल्या कशाच्या पावली हळदी-कुंकूच्या पावली, गौरी आल्या कशाच्या पावली सौभाग्याच्या पावली, गौरी आल्या कशाच्या पावली सोन्याचांदीच्या पावली, गौरी आल्या कशाच्या पावली पाऊसपाणी, गुरंढोरं मुलाबाळांच्या पावलीष्ठअशा अनेक प्रकारे तुमच्या इच्छा यावेळी बोलून दाखवाव्या. कारण गौरी आपल्या घरी येताना भरभराट, धनसंपदा आणि सुखशांती घेऊन येतात.

### गौरीचा नैवेद्य

गौरीचे घरात आगमन झाले की, तिला छान साज-शृगांर करून तिला सजवलं जातं. त्यानंतर तिला खास पालेभाजीचा आणि भाकरीचा नैवेद्य दाखवला जातो. काही ठिकाणी अळूवडी, ढेसे अशा भाज्यांचाही समावेश असतो. त्यानंतर दुसऱ्या दिवशी तिच्यासमोर पंचपक्वान्न ठेवले जातात.

### इतिहास आणि उद्देश

असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया श्री महालक्ष्मी गौरीला शरण गेल्या आणि त्यांनी आपले सौभाग्य अक्षय्य राखण्यासाठी तिची प्रार्थना केली. श्री महालक्ष्मी गौरीने भाद्रपद शुक्ल सप्तमीला असुरांचा संहार करून शरण आलेल्या स्त्रियांचे पती आणि पृथ्वीवरील प्राणी यांना सुखी केले; म्हणून अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात. हे व्रत ३ दिवस चालते. प्रांतभेदानुसार हे व्रत करण्याच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये धातूची, मातीची प्रतिमा करून अथवा कागदावर श्री लक्ष्मीचे चित्र काढून, तर काही ठिकाणी नदीकाठचे ५ लहान खडे आणून त्यांचे गौरी म्हणून पूजन केले जाते. महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी ५ लहान मडक्यांची उतरंड रचून त्यावर गौरीचा मातीचा मुखवटा बसवतात. काही ठिकाणी सुवासिक फुले येणाऱ्या वनस्पतीची रोपे अथवा तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवतात अन् त्यावर मातीचा मुखवटा चढवतात. त्या मूर्तीला साडी नेसवून अलंकारांनी सजवतात. गौरीची स्थापना झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तिची पूजा करून नैवेद्य दाखवतात. तिसऱ्या दिवशी गौरीचे नदीत विसर्जन करतात आणि परत येतांना नदीतील थोडी वाळू किंवा माती घरी आणून ती सर्व घरभर पसरवतात.

### निरोप अन् विशेष प्रथा

पूजा आणि आरती करून पुढील वर्षी लवकर येण्याचे आमंत्रण दिले जाते. गौरीचे विसर्जन केल्यानंतर पाण्यातून थोडी वाळू घरी आणून घरभर व परसातील झाडांवर टाकली जाते. यामुळे घरात समृद्धी नांदते आणि झाडांचे कीटकांपासून संरक्षण होते, अशी श्रद्धा आहे.

### महालक्ष्मी उत्सवामागील पौराणिक कथा

एके काळी उन्मत्त राक्षसांच्या अत्याचाराने देव आणि मानव त्रस्त झाले होते. तेव्हा सर्व स्त्रियांनी देवांसह महालक्ष्मीला शरण जाऊन आपल्या सौभाग्याच्या रक्षणासाठी प्रार्थना केली. भक्तांच्या हाकेला धावून येत महालक्ष्मीने आपल्या प्रखर शक्तीने आणि अतुलनीय शौर्याने दुष्ट राक्षसांचा संहार केला.

या संकटातून मुक्त केल्याबद्दल देवीप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ज्येष्ठागौरी उत्सव साजरा करण्याची परंपरा सुरू झाली.

# स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि एकात्मतेचा गौरवशाली अध्याय

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.

### स्वातंत्र्य मिळाले; पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात ‘जैसे थे’ करार (Standstill Agreement) करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्ध संघर्ष वाढत गेला. हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट कॉंग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक व राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

### मराठवाड्यात जागृतीची बीजे

मराठवाड्यातील मुक्ती संग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कार्याला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली.

१९३८ मध्ये हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातमेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले आहे. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.



### आठ जिल्ह्यांची व्यापक लोकचळवळ

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तीच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता.

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले. या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली.

लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

### दडपशाहीला लोकशक्तीचा प्रतिकार

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्त्यांना अटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला.

प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या ‘भारत छोडो’ चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागाने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

### निजामाची आणि भारताची भूमिका

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी ‘ऑपरेशन पोलो’ सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद राज्य भारतीय संघात सहभागी झाले. केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदीत या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित केले आहे.

स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला; मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला.

भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय व प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते.

भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

### भाषिक वेगळेपणही लक्षणीय ठरले

१९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता. भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.

### १७ सप्टेंबर : मुक्ती संग्राम दिन

महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात ‘मुक्ती संग्राम दिवस’ म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो. विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्ती संग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र शासन मुक्ती संग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

### इतिहासाचा सन्मान, भविष्याची प्रेरणा

मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात-अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला.

१७ सप्टेंबर रोजी तिरंगा अभिमानाने फडकताना त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण होते. हा दिवस अन्यायाविरुद्धच्या लोकशाही मूल्यांच्या आणि भारताच्या एकात्मतेच्या विजयाचे स्मरण करून देतो. मराठवाड्याने भारताच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान इतिहासाच्या पानांवर अढळ आहे. छत्रपती संभाजीनगरपासून नांदेडपर्यंत, जालन्यापासून लातूरपर्यंत, बीडपासून धाराशिवपर्यंत आणि परभणीपासून हिंगोलीपर्यंत या भूमीने स्वातंत्र्याची आस जपली आणि राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी संघर्ष केला. त्या ज्ञात-अज्ञात वीरांना आणि वीरांगनांना कृतज्ञ अभिवादन करणे आणि त्यांच्या त्यागातून लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची खरी प्रेरणा आहे.

१७ सप्टेंबर हा त्यामुळे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो मराठवाड्याच्या देशभक्तीला, लोकशक्तीला आणि अखंड भारताच्या एकात्मतेला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

**प्रवीण टाके**
उपसंचालक
विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# गणपती Special... अंकातून व्यक्तिमत्त्वाचा शोध

## मूलांक 2 - मन नाजूक... पण भावनांची ताकद अफाट!

कोणी दुःखी असेल तर त्याच्या चेहऱ्यावरचं हसूही त्यांना खोटं वाटतं.

कोणी नाराज असेल तर “काही नाही” म्हटलं तरी त्यांना सगळं जाणवतं.

हीच मूलांक २ ची खासियत आहे.

ज्यांचा जन्म २, ११, २० किंवा २९ तारखेला झाला आहे, त्यांचा मूलांक २ मानला जातो. अंकशास्त्रानुसार मूलांक २ वर चंद्राचा प्रभाव मानला जातो—म्हणूनच भावना, संवेदनशीलता, कल्पनाशक्ती आणि अंतर्मुखता यांचा प्रभाव या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो.

मूलांक २ — भावना हीच ताकद

मूलांक २ ची व्यक्ती सहसा समोरच्याचं बोलणं फक्त ऐकत नाही...

ती ते मनापासून अनुभवते.

म्हणूनच अशा व्यक्ती चांगल्या मित्र, समजूतदार पालक, उत्तम शिक्षक, counsellor किंवा विश्वासू partner होऊ शकतात.

त्यांना “मी” पेक्षा “आपण” हा शब्द जास्त जवळचा वाटतो.

“तुला काय वाटतं?”

“आपण दोघांनी मिळून ठरवूया.”

“तू ठीक आहेस ना?”

हे त्यांचं स्वाभाविक बोलणं असतं.

पण याच संवेदनशीलतेची दुसरी बाजूही आहे...

एखादं छोटंसं वाक्य त्यांना दिवसभर विचार करायला लावू शकतं.

टीका मनाला लागते.

समोरच्याने दुर्लक्ष केलं तर ते बाहेरून शांत राहतात... पण आतून खूप काही चाललेलं असतं.

Overthinking, mood swings आणि स्वतःपेक्षा इतरांच्या भावनांना जास्त महत्त्व देणं—ही त्यांची आव्हानं ठरू शकतात.

काही प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांकडे पाहूया...

महात्मा गांधी — २ ऑक्टोबर

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात संयम, शांतता, संवाद आणि लोकांच्या भावनांना समजून घेण्याची क्षमता दिसून येते. संघर्षाचा मार्गही त्यांनी मोठ्या प्रमाणावर अहिंसा आणि संवादातून निवडला.

लाल बहादूर शास्त्री — २ ऑक्टोबर

अत्यंत साधेपणा, नम्रता आणि शांत नेतृत्व हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. मोठ्या पदावर असूनही लोकांशी जोडलेपणाची भावना कायम राहिली.

राजेश खन्ना — २९ डिसेंबर

भावना व्यक्त करण्याची शैली, अभिनयातील संवेदनशीलता आणि प्रेक्षकांशी निर्माण झालेलं भावनिक नातं त्यांच्या लोकप्रियतेचा महत्त्वाचा भाग होतं.

दिलीप कुमार — ११ डिसेंबर

अभिनयातील भावनिक खोली आणि व्यक्तिरेखेत पूर्णपणे उतरून जाण्याची क्षमता यामुळे त्यांनी अभिनयाला एक वेगळी उंची दिली.

Michael Jackson — २९ ऑगस्ट

असामान्य creativity, संगीताची जाण आणि स्वतःची वेगळी artistic expression यामुळे त्यांनी जगभरात वेगळी ओळख निर्माण केली.

अमिताभ बच्चन — ११ ऑक्टोबर

संवेदनशीलता आणि संयमातून निर्माण झालेली ताकद हे त्यांच्या प्रवासाकडे पाहताना विशेष जाणवतं.

अभिनयाच्या क्षेत्रात प्रचंड यश मिळवल्यानंतरही त्यांच्या आयुष्यात कठीण टप्पे आले. करिअरमधील चढ-उतार, अपयश, आर्थिक अडचणी आणि वैयक्तिक संघर्ष—या सगळ्यांमधून त्यांनी स्वतःला पुन्हा उभं केलं.

त्यांच्या अभिनयातील भावनिक खोली, संवादफेकीतील वजन आणि प्रेक्षकांशी निर्माण झालेलं नातं हे केवळ लोकप्रियतेपुरतं मर्यादित राहिलं नाही.




मूलांक २ ची ताकद कधी आवाजात नसते... ती मनाच्या खोलीत असते.

“हालात चाहे जैसे भी हों,

इंसान की असली पहचान इस बात से होती है—

कि वो खुद को कितनी बार संभालता है।”

प्रेम आणि नाती

मूलांक २ ची व्यक्ती प्रेम मोठमोठ्या शब्दांत व्यक्त करेलच असं नाही.

पण तुम्हाला आवडणारी गोष्ट लक्षात ठेवणं,

तुमची काळजी घेणं,

तुम्ही शांत का आहात हे विचारणं...

ही त्यांची प्रेम व्यक्त करण्याची भाषा असते.

पण एक गोष्ट त्यांनी शिकणं गरजेचं आहे—

इतरांना समजून घेताना स्वतःला हरवू नका.

प्रत्येक वेळी तुम्हीच समजून घ्यायचं, तुम्हीच adjust करायचं आणि तुम्हीच शांत राहायचं असं नाही.

Career आणि Money

मूलांक २ च्या व्यक्तींना माणसांशी जोडलेलं आणि creativity वापरता येणारं काम चांगलं suit होऊ शकतं.

Teaching, counselling, writing, art, communication, hospitality, public relations यांसारख्या क्षेत्रांत त्यांची संवेदनशीलता आणि people skills उपयोगी पडू शकतात.

Money बाबतीतही भावनेपेक्षा planning आणि consistency महत्त्वाची. कारण कधी कधी इतरांसाठी खर्च करताना किंवा भावनेच्या भरात निर्णय घेताना स्वतःच्या आर्थिक नियोजनाकडे दुर्लक्ष होऊ शकतं.

चंद्रासारखं व्यक्तिमत्त्व. चंद्र रोज एकसारखा दिसत नाही. कधी पूर्ण, कधी अर्धा, कधी दिसतही नाही.

पण तो असतोच. मूलांक २ ची व्यक्तीही तशीच असते. कधी खूप बोलणारी, कधी स्वतःमध्ये हरवलेली, कधी अतिशय उत्साही, तर कधी शांत...

पण त्या शांततेच्या मागे अनेक भावना आणि विचार दडलेले असतात.

गणपती बाप्पांचा संदेश

संवेदनशील असणं ही कमजोरी नाही. तुम्ही जे इतरांना जाणवू शकत नाही ते जाणवता—ही तुमची ताकद आहे. फक्त त्या भावनांना तुमच्यावर राज्य करू देऊ नका.

मनाचे ऐका... पण निर्णय घेताना बुद्धीलाही सोबत घ्या. एक महत्त्वाची गोष्ट फक्त मूलांक २ पाहून संपूर्ण व्यक्तिमत्त्व ठरवता येत नाही. तुमच्या पूर्ण जन्मतारखेत २ हा अंक किती वेळा आला आहे, इतर कोणते अंक आहेत आणि त्यांची परस्पर रचना काय आहे—यावरही त्या अंकाची तीव्रता आणि अभिव्यक्ती बदलू शकते. म्हणूनच प्रत्येक मूलांक २ व्यक्ती सारखी नसते. अंक फक्त संख्या नाहीत, प्रत्येक अंकामागे एक स्वभाव, एक संघर्ष आणि एक कहाणी असते.

तुमचा मूलांक २ आहे का?

तुमच्यातील यापैकी कोणता गुण तुम्हाला सर्वात जास्त जाणवतो? Comment करून नक्की सांगा.



**सीमा बक्षी**
अकोला
मो. नं.
9834571153

# जलजीवनचे पाईप चोरणारी टोळी जेरबंद

## 43.39 लाखांचा मुद्देमाल जप्त; तिघांना अटक

वि.प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अकोट:** अकोट ग्रामीण पोलिसांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलजीवन योजनेतील पाईप चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत तीन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत ९ लाख ३९ हजार २२८ रुपयांचे ८२ पाईप, दोन आयशर ट्रक आणि एक चारचाकी वाहन असा एकूण ४३ लाख ३९ हजार २२८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांवर आळा घालण्यासह आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पोलीस गस्त वाढविण्याच्या दिलेल्या सूचनांनुसार अकोट ग्रामीण पोलिसांचे पथक १४ सप्टेंबर रोजी रात्री गस्त घालत होते. यावेळी अकोली जहांगीर फाट्याजवळ दोन आयशर ट्रकमध्ये काही इसम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामासाठी ठेवण्यात आलेले पाईप भरत असल्याचे निदर्शनास आले.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेताच काही संशयित चारचाकी वाहनातून पसार झाले. मात्र, दोन आयशर ट्रक आणि त्यांचे चालक पोलिसांच्या ताब्यात आले. चौकशीदरम्यान चालकांनी समाधानकारक उत्तरे न दिल्याने दोन्ही वाहने पोलीस ठाण्यात आणून तपास सुरू करण्यात आला.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, अकोट येथील अधिकाऱ्यांनी वाहनांमधील पाईपांची पाहणी केली असता ते पोपटखेड गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील असल्याचे निष्पन्न झाले. संबंधित अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६४२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०३(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणात मनीष अरुणराव मैन (वय २९, रा. नटाळा पुनर्वसन, जि. वर्धा) व कपिल अशोकराव दुधे (वय ४१, रा. पुजई, जि. वर्धा) या दोन्ही ट्रक चालकांना अटक करण्यात आली. पोलीस कोठडीदरम्यान झालेल्या चौकशीत प्रभाकर वसंतराव भताने (वय ३९, रा. गोढाळा, ता. रेणापूर, जि. लातूर) याच्या सांगण्यावरून ही चोरी करण्यात आल्याचे समोर आले. त्यालाही अटक करण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, सहाय्यक पोलीस अधीक्षक निखिल पाटील आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार श्रीधर गुठ्ठे, पोउपनि वैभव तायडे, पोहेकॉ योगेश जऊळकार, भास्कर सांगळे, गोपाल जाधव, गणेश फोकमारे, विठ्ठल चव्हाण, शैलेश जाधव, शुभम लुंगे, शुभम गिरी, सायबर पोलिसांचे आशिष आमले, स्वप्नील दामोदर तसेच होमगार्ड सुनिल वाळके व प्रवीण इंगळे यांनी या यशस्वी कारवाईत सहभाग घेतला.

# डीजेच्या कर्णकर्कश आवाजाविरोधात डॉ. श्रीकांत तिडके यांची आक्रमक भूमिका

प्रतिनिधी १७ सप्टेंबर



**मुर्तीजापूर :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करताना केवळ धार्मिक उत्सवाचा विचार केला नव्हता, तर समाजप्रबोधन, जनजागृती आणि वैचारिक चळवळीला चालना देण्याचा त्यामागील व्यापक उद्देश होता. गणेशोत्सवाच्या माध्यमातून वादविवाद, वक्तृत्व, चर्चा, व्याख्याने आणि सामाजिक प्रश्नांवर वैचारिक मंथन व्हावे, अशी त्यांची भूमिका होती. मात्र, गेल्या काही वर्षांत उत्सवाचे स्वरूप बदलत असून, धार्मिक कार्यक्रमांमध्ये वाढता राजकीय हस्तक्षेप, ध्वनिप्रदूषण आणि अनावश्यक शक्तिप्रदर्शन याबाबत चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर डीजेच्या कर्णकर्कश आवाजाविरोधात शहरातील ज्येष्ठ नागरिक, प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर व शिक्षकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

यावेळी डॉ. श्रीकांत तिडके यांनी भावनिक प्रतिक्रिया व्यक्त करताना "धर्माच्या नावावर चुकीच्या गोष्टींचे समर्थन करण्यापेक्षा समाजाच्या हिताचा विचार करण्याची गरज आहे," असे मत मांडले. धार्मिक उत्सवांचा उद्देश समाजाला जोडणे, प्रबोधन करणे आणि चांगल्या विचारांची देवाणघेवाण करणे हा असताना आज मोठ्या आवाजातील डीजे, नृत्य आणि ध्वनिप्रदूषण यामुळे उत्सवाचे मूळ स्वरूपच बाजूला पडत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

"लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला, तेव्हा त्यामागे समाजाला एकत्र आणण्याबरोबरच वैचारिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश होता. वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, व्याख्याने आणि सामाजिक विषयांवर चर्चा व्हावी, अशी अपेक्षा होती. आज मात्र आपण त्या मूळ उद्देशापासून दूर जात आहोत," असे डॉ. तिडके यांनी सांगितले.

### प्रशासनाला निवेदन

धर्माच्या नावावर वाढणाऱ्या अंधानुकरणाबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. "धर्म आपल्याला माणुसकी, संयम आणि सद्भावना शिकवतो. त्यामुळे धर्माच्या नावावर समाजात त्रास, ध्वनिप्रदूषण किंवा द्वेष निर्माण करणाऱ्या गोष्टींचे समर्थन करता कामा नये," असे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी ज्योतिराव फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातील सामाजिक आशयाचा संदर्भ देत शेतकरी आणि सामान्य नागरिकांनी आपल्या मूलभूत प्रश्नांकडेही लक्ष द्यावे, असे आवाहन केले. "सोयाबीन जळते, कापूस करपतो, शेतकरी संकटात असतो; अशा वेळी शेतकऱ्यांच्या मुलांनी डीजेच्या तालावर नाचण्यातच समाधान मानायचे का? आपल्या प्रश्नांवर आपण आवाज उठवणार की केवळ उत्सवाच्या आवाजात ते प्रश्न दडपून टाकणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

डीजेच्या वाढत्या वापराबाबत प्रशासनाने नियमांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. धार्मिक कार्यक्रमांच्या नावाखाली ध्वनिप्रदूषण होत असेल, तर त्याकडे प्रशासनाने केवळ बघ्याची भूमिका न घेता कायद्यानुसार कारवाई करणे आवश्यक असल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले. "तुम्ही लढा, आम्ही फक्त कारवाई केल्यासारखे करतो," अशा प्रकारची प्रशासनाची भूमिका असू नये, असेही डॉ. तिडके यांनी स्पष्ट केले.

गणेशोत्सवात अथवा अन्य धार्मिक कार्यक्रमांत मोठ्या आवाजातील डीजे आणि त्यावर होणाऱ्या नृत्याला प्रोत्साहन देण्याऐवजी सांस्कृतिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांना प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विशेषतः प्रसिद्ध कलाकारांच्या कार्यक्रमांमध्येही ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे पालन होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी रतनलाल महाजन, डॉ. तुषार भास्कर, प्रा. अविनाश बेलाडकर, श्रीकृष्ण बोळे सुरेश जोगळे योगेश कोरडे राजू पाटील अरविंद तायडे अजबराव वहिले राजू पाटील वानखडे यांच्यासह शहरातील अनेक ज्येष्ठ व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# सुरक्षित वाहतूक व्यवस्थेसाठी ऑटो युनियनचा सहकार्याचा हात

## ऑटो चालकांना गणेवश अनिवार्य पोलिस निरीक्षक विलास पाटील यांचे निर्देश

प्रतिनिधी १७ सप्टेंबर



**अकोला :** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत व सुरक्षित ठेवण्यासाठी बस स्टँड ऑटो युनियनने वाहतूक विभागाला सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. बसस्टँड ऑटो युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी अकोला ट्रॅफिक प्रभारी विलास पाटील यांचे स्वागत केले. आगामी सणांच्या काळात शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन ऑटो युनियनच्या वतीने देण्यात आले. बैठकीदरम्यान वाहतूक पोलिसांनी ऑटोचालकांना वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले. तसेच ऑटोचालकांनी नियमानुसार युनिफॉर्म परिधान करावा, प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे आणि विशेषतः शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन वाहन चालवावे, असे आवाहन करण्यात आले.

ऑटो युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी अकोला ट्रॅफिक प्रभारी विलास पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आगामी सण-उत्सवांच्या काळात वाहतुकीची वाढती वर्दळ लक्षात घेता ऑटोचालकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करून शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्थेस हातभार लावावा, असेही यावेळी सांगण्यात आले.

# पूर्वकल्पनेविना शेतकऱ्याचा बांध तोडला

## संतप्त शेतकऱ्याने अधिकाऱ्याच्या तोंडावर भिरकावले कागदपत्र

प्रतिनिधी १७ सप्टेंबर



अकोला. म्हैसांग मजलापुर शिवदांड शिवारात तहसील प्रशासनाने पोलीस बंदोबस्तात शेताचा जुना बांध तोडल्याने एकच तणाव निर्माण झाला. प्रशासनाने कुठलीही पूर्वकल्पना न देता किंवा लेखी आदेश न दाखवता ही कारवाई केल्याचा आरोप शेतकरी कुटुंबाने केला आहे. सखुबाई डोंगरे यांनी प्रशासनाकडे एक महिन्यापूर्वीच लिखित आक्षेप नोंदवून, अल-निनोच्या संकटात आणि पावसाळ्यात हे काम न करता उन्हाळ्यात करावे, जेणेकरून शेती पिकाचे नुकसान होणार नाही अशी विनंती केली होती. मात्र, प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. यादरम्यान, जेव्हा शेतकरीपुत्र आनंद डोंगरे यांनी जाब विचारला, तेव्हा अधिकाऱ्यांनी "तुम्हाला कोर्टात जायचं असेल तर जा," अशी अरेरावीची भाषा वापरली. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्याचा राग अनावर झाला आणि त्यांनी थेट मंडळ अधिकारी काळेंच्या तोंडावर कागदपत्र फेकून आपला रोष व्यक्त केला. दरम्यान, पोलीस बंदोबस्ताने मध्यस्थी करत प्रकरण शांत केले. यावर संबंधित अधिकाऱ्यांशी आपलं काही म्हणणं आहे का असे म्हटले असता त्यांनी बोलण्यास नकार दिला तसेच वरिष्ठांशी संपर्क केला असता ते व्यस्त असल्याचा समजलं. यादरम्यान, सध्या या मनमानी कारभारावर ग्रामस्थांमधून संताप व्यक्त होत असून, प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन शेतकऱ्याला न्याय द्यावा तसेच शेतकऱ्यांचं मोठा आर्थिक नुकसान झालं असून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे.

# निवृत्ती वेतन बचत खातेधारकांना 30 लाखाचा मोफत अपघात विमा लागू करा

## भाजप सेल तर्फे डॉ. जयराज कोरपे यांचेशी चर्चा व मागणी



प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अकोला:** जे सेवानिवृत्त कर्मचारी अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून निवृत्ती वेतन घेतात त्यांना 30 लक्ष रुपयांचा मोफत अपघाती विमा लागू करून त्यांना संकट काळात संरक्षण द्यावे. त्याचप्रमाणे वेतन बचत खाते हे सर्व समावेशक निवृत्तीवेतन योजने ( कॉम्प्रेसिव्ह पेन्शन पॅकेज ) मध्ये परावर्तित करून या योजनेअंतर्गत असलेल्या सर्व सुविधा निवृत्ती वेतनधारकांना उपलब्ध करून द्याव्यात.

अशी महत्वपूर्ण मागणी भाजप सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी सेल तर्फे करण्यात आली आहे. या मागणी संदर्भात सेलचे संयोजक सुनील जानोरकर, सहसंयोजक प्रदीप खाडे, सरचिटणीस राजेंद्र नेरकर, कोषाध्यक्ष अशोक मांगुळकर यांनी बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांची भेट घेऊन त्यांना या मागणीचे निवेदन सादर केले व सकारात्मक चर्चा केली. त्यांनीही या मागणीची दखल घेऊन बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी तातडीने चर्चा करून याबाबत सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

ही योजना लागू झाल्यास एखाद्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे अपघाती निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना 30 लाख रुपयांचा लाभ मिळू शकतो. स्टेट बँक किंवा इतर राष्ट्रीयकृत बँकांमधून सेवानिवृत्ती वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हा अपघाती विमा लागू आहे.

केंद्रीय अर्थ मंत्रालय अंतर्गत राष्ट्रीयकृत व सार्वजनिक क्षेत्रातील बँकेतुन शासकीय सेवानिवृत्ती वेतन घेणाऱ्या वेतनधारकांना सर्वसाधारण निवृत्तीवेतन योजने ( कॉम्प्रेसिव्ह पेन्शन पॅकेज ) अंतर्गत सर्व फायदे देण्यात येतात. या योजनेचा मुख्य उद्देश पेन्शन धारकांना केवळ मासिक उत्पन्न किंवा मासिक निवृत्तीवेतन देणे एवढाच नसून विमा आणि इतर आर्थिक सुविधांचा एकत्रित संच देणे आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत जिल्हा परिषदेमधील नियमित वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना एस. एम. एस. सेवा व एटीएम कार्ड याशिवाय इतर कोणत्या सुविधा देण्यात येत नाहीत. त्यामुळे ही सी. पी. पी. योजना लागू करून त्या अंतर्गत झिरो बॅलन्स खाते, 30 लाख रुपयांचा मोफत अपघाती विमा, मोफत डेबिट कार्ड, पेन्शन लोन व चेक बुक सुविधा देण्यात याव्यात अशी महत्त्वाची मागणी भाजप सेल तर्फे करण्यात आली आहे.

# अकोटचे राजे भोसले कालीन सिद्धिविनायक गणपती मंदिर

पवन बेलसरे १७ सप्टेंबर

**अकोट :** अकोट शहरातील शहराला पौराणिक आणि ऐतिहासिक जागृत साक्ष देणारा २७५ वर्षाचा प्राचीन काळातील उजव्या सोंडीचा सिद्धिविनायक व पाच मुखी शिवलिंग नंदी गणपती मंदिराची अकोट मधील महात्मा फुले चौक सोमवार वेस भागात १८ व्या शतकात रघुजी भोसले यांनी बांधलेले सिद्धिविनायक मंदिर सर्वदूर प्राख्यात आहे. आजही शहराच्या भाविकांचे श्रद्धास्थान पुरातन इतिहासाची हे मंदिर साक्षात्कार देत आहे. गणेशमूर्ती ही डाव्या सोंडेची असते. परंतु या मंदिरातील काळ्या पाषाणातील ही गणेशमूर्ती उजव्या सोंडेची असून, अख्ख्या महाराष्ट्र महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक मनोकामना पूर्ण व्हावी व दर्शनाचा लाभ घेण्याकरता येत असतात. अकोट शहराला पुरातन ऐतिहासिक वारसा आहे. नागपूर सुभ्याचा कारभार सांभाळणारे रघुजी भोसले यांनी १८ व्या शतकात अकोटातील सोमवारवेस येथे सिद्धिविनायक मंदिराची स्थापना केली होती, यासंदर्भात एक आख्यायिका आहे ती अशी, सन १७५१ मध्ये रघुजी भोसले हे कर आणि शेतसारा वसुलीसाठी अकोट परिसरात आले होते. निजामाला त्याची चाहूल लागताच त्याने रघुजी भोसलेंवर हल्ला केला. अकोटातील





सोमवारवेस भागात रघुजी भोसले यांचा हत्तीखाना, घोडपागा आणि सैन्याची एक तुकडी होती. निजामाच्या अचानक हल्ल्यामुळे रघुजी भोसले यांनी या हत्तीखान्यात आश्रय घेतला, त्यामुळे त्यांचे प्राण वाचले. त्यादिवशी संकष्ट चतुर्थी होती. गणेशानेच हत्तीच्या रूपात आपले प्राण

अठराव्या शतकातील अकोटचे सिद्धिविनायक मंदिर प्राण वाचवले म्हणून त्यांनी या ठिकाणी सिद्धिविनायकाचे मंदिराची स्थापना केली असे भाविकांकडून सांगितले जाते. अकोट परिसरातील अडगाव-सिरसोली येथे सन १८०२ मध्ये इंग्रज आणि मराठ्यांचे युध्द झाले होते. त्यावेळी युध्दासाठी रघुजी भोसले हे अकोट परिसरात आले होते. तशी शासकीय नोंददेखील अकोला डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरमध्ये आहे. सिद्धिविनायक मंदिराबरोबरच भोसल्यांनी अकोट शहरात आणखी दोन गणेश मंदिराची बांधणी केल्याचे सांगितले जाते. नरसिंग महाराज मंदिराजवळ डाव्या सोंडेची प्राचीन गणपती मंदिर आहे. तर तिसरे गणपती मंदिर परकीय आक्रमणात नष्ट झाल्याचे भाविक सांगतात. सिद्धिविनायक मंदिरात दरवर्षी गणेश जयंती अत्यंत उत्सवात साजरी केली जाते. या दिवशी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

### मूर्तीचे शेंदुर लेपाने झाकले होते रूपा

सिद्धिविनायक मंदिरातील मूर्ती ही पूर्वी शेंदुरचर्चित भला मोठा तांदळा होता. मात्र, फेब्रुवारी २००१ मध्ये शेंदुराचा हा थर निखळल्याचे बोलले जाते. त्या शेंदुर लेपाखाली सिद्धिविनायकाची मूर्ती शाबूत दिसून आली. अतिशय सुंदर, मनमोहक, रेखीव, कोरीव आणि उजव्या सोंडेच्या गणेशमूर्तीचे हे मूळरूप अनेक वर्ष शेंदुरलेपखाली झाकलेले होते. साडेचार फूट उंच, ३ फूट रुंद अशी काळ्या पाषाणातील ही चतुर्भुज मूर्ती आहे. सिंहासनावर आरूढ असलेल्या या मूर्तीच्या डोक्यावर नागदेवता आहे.

### मंदिरात जागृत पंचमुखी शिवलिंग व नंदी

सिद्धिविनायक गणपती मंदिराच्या गाभाऱ्याच्या समोरील सभा मंडपात भव्य तेजोमय प्राचीन काळातील पंचमुखी शिवलिंग व नंदी आजही भाविकांना मनोकामना जागृत साक्षरताराचा विभोती देत आहे, व मंदिर परिसरात औदुंबराचे झाड आहे. मंदिरात अखंड दिवा असून मंदिरामध्ये दर गुरुवार भजन कीर्तन व कार्तिक महिन्यामध्ये काकडा ठोलाचे भजन व सांप्रदायिक टाळकरी भजन राहतो बाराही महिने चतुर्थीला भाविकांना भव्य उसळ वाटप केल्या जाते येथील कार्यक्रमाचे आयोजन श्री सिद्धिविनायक नवयुग मंडळ दरवर्षी भव्य महाप्रसादाची वाटप आयोजन करत असते,

अकोट शहरातील पुरातन सिद्धिविनायक मंदिर शहराचा ऐतिहासिक वारसा आहे. भाविकांनी काही वर्षांपूर्वी या मंदिराच्या सभागृहाचे बांधकाम नवयुवक यांनी श्रमदानातून केले होते. भाविक पंचक्रोशीतून तर दूर दूर वरून नेहमीच येथे दर्शनासाठी येत असतात. महात्मा फुले चौक, सोमवारवेस परिसरात हे मंदिर आहे.आजही सिद्धिविनायकाच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी उसळत आहे,

# हॉलमार्किंग शुल्क वाढीमुळे व्यावसायिकांमध्ये रोष

## हॉलमार्किंग शुल्क 45 रुपयांवरून 75 रुपये

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अकोला :** सोन्या-चांदीच्या दागिन्यांवर अनिवार्य असलेल्या हॉलमार्किंगच्या शुल्कात अचानक वाढ करण्यात आल्याने अकोला जिल्ह्यातील सराफा व्यावसायिकांमध्ये नाराजी पसरली आहे. ४५ रुपयांवरून थेट ७५ रुपये करण्यात आले हॉलमार्किंगचे शुल्क असून, सुमारे ६७ टक्के वाढीचा अतिरिक्त भार अखेर ग्राहकांच्या खिशावर पडण्याची शक्यता आहे. आधीच सोन्याचे दर विक्रमी

६७ टक्के वाढीचा अतिरिक्त भार अखेर ग्राहकांच्या खिशावर पडत आहे.ग्राहकांसाठी सोने खरेदी करणे कठीण झाले आहे.

अकोला शहरासह जिल्ह्यात लग्नसमारंभ, सण-उत्सव किंवा अत्यावश्यक प्रसंगीच सोने खरेदीला प्राधान्य दिले जात असल्याचे व्यावसायिक सांगतात. हॉलमार्किंगसाठी वाढलेले शुल्क ग्राहकांच्या खर्चात आणखी भर घालणार आहे. व्यवसायावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने सराफा व्यावसायिकांनी रोष व्यक्त केला आहे. सराफा

व्यवसायावर दुहेरी परिणामाची भीती सोन्याच्या वाढलेल्या किमतीमुळे ग्राहकसंख्या आणि खरेदीचे प्रमाण प्रभावित झाले आहे. त्यात आता हॉलमार्किंग शुल्कवाढीची भर पडल्याने ग्राहकांचा अतिरिक्त खर्च वाढणार आहे. बाजारात लग्नसराई आणि सणासुदीच्या काळात दागिन्यांची खरेदी वाढते, मात्र सोन्याच्या वाढत्या किमतीमुळे ग्राहकांकडून वजन आणि डिझाइनबाबतही काटकसर केली जात आहे. शुल्कातील वाढीचा परिणाम छोट्या-मोठ्या प्रत्येक खरेदीवर जाणवू शकतो.



सराफा व्यवसायामुळे देशात ४ कोटींपेक्षा जास्त जणांना रोजगार मिळतो. सरकारला सर्वांत जास्त महसूल सराफा व्यवसायातूनच मिळतो. हा व्यवसाय वाढीसाठी पावले उचलणे सोडून अडचणी निर्माण करण्यात येत आहेत. हॉलमार्कचे शुल्क वाढवणे हा त्याचाच एक भाग आहे. सरकारचा उद्देश बरोबर नसल्याचे यातून दिसते.

**प्रा. संतोष हुसे,**
सराफा व्यावसायिक, अकोला


## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार **शिरिष ना. जांगडे,** जाहीर सूचना देतो की, **मौजा वऱ्हा, ता. तिवसा, जि. अमरावती** येथील **सर्वे नंबर ८२०, भोगवटदार वर्ग १, क्षेत्रफळ ६० आर. (दिड एकर)** शेत माझ्या मालकीचे असून माझ्या ताब्यात आहे. सदर शेताची खरेदी ही मोजणी झाल्यानंतर करण्याचे ठरले आहे. तसे भरणा व ताबा पावती मला करून दिली आहे. सदर शेताचा कुठलाही, कोणताही खरेदीचा किंवा गहाणखताचा व्यवहार **नम्रता दिनेश होले,** रा. अर्जुनगर, अमरावती यांचेसोचत कोणीही करू नये, तसा व्यवहार केल्यास त्यास मी जबाबदार राहणार नाही. माझी खरेदी शेत मोजणीनंतर करायचे ठरले आहे.

करीता जाहीर सूचना.

**ठिकाण : अमरावती**

**दिनांक : १६/०९/२०२६**

**सही,**
**शिरिष ना. जांगडे**
**मो. क्र. : ९५६१०६१९९७**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

गुरूवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


## म्हसोल्यात आज रुग्णवाहिकेचे लोकार्पण

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**आर्णी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आर्णी तालुक्यातील म्हसोला (कान्होबा) येथे गुरुवारी (ता. १७) रुग्णवाहिका लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. म्हसोला, पांगरी, पहूर आणि शेकलगाव परिसरातील नागरिकांना आपत्कालीन वैद्यकीय सेवा तातडीने उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ही रुग्णवाहिका सेवेत दाखल करण्यात येणार आहे. म्हसोला येथील कान्होबा देवस्थान मंदिर परिसरात सायंकाळी सहा वाजता हा कार्यक्रम होणार आहे. कान्होबा देवस्थान गणेशोत्सव मंडळ, बंजारा दुर्गोत्सव मंडळ, परिसरातील विविध मंडळे व ग्रामस्थांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास गणपती संस्थान खेडच्या अध्यक्ष नीता आडे, कामगार उपायुक्त (सेवानिवृत्त) राजेश आडे यांची उपस्थिती राहणार आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचविण्यासाठी रुग्णवाहिका उपयुक्त ठरणार असून, नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांच्या निवासाला वंचितचा घेराव

### ४,६०१.१३ कोटींचा निधी परत करा; वंचित बहुजन आघाडीची मागणी

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**यवतमाळ :** अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी असलेला ४,६०१.१३ कोटींचा निधी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेकडे वळविल्याचा आरोप करीत वंचित बहुजन आघाडीने आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या यवतमाळातील निवासस्थानाला घेराव घातला. जिल्हाध्यक्ष डॉ. निरज वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेकडो कार्यकर्ते आणि अनुसूचित जाती-जमातींचे नागरिक सहभागी झाले.

अनुसूचित जाती घटकातील ३,५९४.०३ कोटी आणि अनुसूचित जमाती घटकातील १,००७.१० कोटी, असा एकूण ४,६०१.१३ कोटींचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वळविण्यात आला आहे. हा निधी अनुसूचित जाती-जमातींच्या शिक्षण, शिष्यवृत्ती, आरोग्य, पाणीपुरवठा, सामाजिक-आर्थिक विकास तसेच दलित व आदिवासी वस्ती विकासासाठी वापरला जाणे अपेक्षित असल्याचा दावा आघाडीने केला. राज्यव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून यवतमाळात करण्यात आलेल्या घेरावावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

अनुसूचित जाती-जमातींच्या विकासाचा निधी इतरत्र वळविण्याच्या निर्णयाबाबत सरकारने स्पष्टीकरण द्यावे आणि निधी संबंधित विभागांना परत करावा, अशी मागणी करण्यात आली. "अनुसूचित जाती-जमातींच्या हक्काच्या निधीला हात लावणे आम्हाला मान्य नाही. हा पैसा समाजाच्या विकासासाठी आहे. ४,६०१.१३ कोटींचा निधी संबंधित विभागांना परत मिळालाच पाहिजे. आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी आदिवासी समाजाच्या निधीच्या संरक्षणासाठी ठोस भूमिका घ्यावी. निधी परत आणण्यासाठी पुढाकार न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल," असा इशारा डॉ. निरज वाघमारे यांनी दिला.

> ■ "हा केवळ निधीचा प्रश्न नसून अनुसूचित जाती-जमातींच्या शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पुढील पिढीच्या भविष्याचा प्रश्न आहे. निधी परत मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील," असे डॉ. वाघमारे यांनी सांगितले.






या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीचे ॲड. डॉ. अरुण (आबा) जाधव, प्रशांत इंगोले, चित्राताई कुरे, सारंग थोरात, कृष्णा देशमुख, शहराध्यक्ष प्रसेनजित भवरे यांच्यासह मधुकर कांबळे, संघपाल कांबळे, रणधीर चव्हाण, विकास मून, सनी ढबाले, ज्ञानेश्वर मून, प्रशिक बरडे, श्रीराम भोयर, यशपाल खाडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

## एमडी तस्करीचा पर्दाफाश; एक जण ताब्यात

प्रतिनिधी १७ सप्टेंबर



**यवतमाळ :** यवतमाळ शहरात एमडी (मेफेड्रोन) नावाच्या अंमली पदार्थाची वाहतूक करणाऱ्या इसमाला स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून ताब्यात घेतला. त्याच्याकडून १८.५४ मिलीग्राम एमडीसह एकूण ९३,५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात एक अल्पवयीन बालकही सामील असल्याचे समोर आले आहे. शेख मोसीन शेख नईम (वय २३, रा. जाफरनगर, यवतमाळ) असे आरोपीचे नाव आहे.

अभ्यंकर शाळेसमोरील दत्त चौकाकडे जाणाऱ्या गल्लीतून एक इसम बॅगेत एमडी आणि घातक शस्त्र घेऊन येणार आहे. त्यानुसार पथकाने आवश्यक कायदेशीर परवानग्या घेऊन अभ्यंकर शाळेजवळ सापळा रचला. बातमीनुसार वर्णन केलेला इसम एका अल्पवयीन बालकासह तेथे आला. त्याला थांबवून चौकशी केली असता त्याचे नाव शेख मोसीन शेख नईम (वय २३, रा. जाफरनगर, यवतमाळ) असल्याचे समोर आले. दुसरा बालक अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाले. दोघांची अंगझडती आणि बॅगेची तपासणी केली असता बॅगेत पांढऱ्या रंगाची पावडर सापडली. चौकशीत त्यांनी ती एमडी (मेफेड्रोन) असल्याचे सांगितले. पंचासमक्ष १८.५४ मिलीग्राम एमडी (बाजारभाव प्रतिग्राम ५५,६२० रुपये), दोन धारदार चाकू (किंमत २,५०० रुपये), एक वापरलेला मोबाइल (३५,००० रुपये) आणि अंगावरील कपडे (४०० रुपये) असा एकूण ९३,५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी अवधुतवाडी पोलीस स्टेशनमध्ये एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी शेख मोसीन आणि विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सतिश चवरे आणि पोलीस निरीक्षक (स्थानिक गुन्हे शाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सपोनि मनिष गावंडे, गजानन राजमल्लू, पोउपनि सागर इंगळे तसेच अंमलदार अजय डोळे, रुपेश पाली, योगेश डगवार, मिलींद दरेकर, सुनिल पैठणे, आकाश सुर्यवंशी, प्रतिक नेवरे, द्रेवेद्र होले, रुषीकेश फुलकर, चालक युवराज जाधव आणि महिला अंमलदार अर्पीता चौधरी (सायबर पोलीस स्टेशन) यांचा सहभाग होता.

## भीमगीते, पोवाडे गाणाऱ्या कलावंतांना योजनेतून वगळले

### रिपाइंचे जिल्हाध्यक्ष महेंद्र मानकर यांचा आरोप; चौकशीची मागणी

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**यवतमाळ :** राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेच्या सन २०२५-२६ च्या लाभार्थी यादीत भीमगीते, रमाईगीते, अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे, आंबेडकरी प्रबोधन सादर करणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना डावलण्यात आल्याचा आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे जिल्हाध्यक्ष महेंद्र मानकर यांनी केला आहे. गेल्या चार वर्षांतील निवड याद्यांची निष्पक्ष चौकशी करून पात्र कलावंतांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.




राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत ही योजना राबविण्यात येते. ज्येष्ठ साहित्यिक, कलावंतांची त्यांच्या कला प्रकारानुसार गुणवत्ता ठरवून लाभार्थी निवड केली जाते. मात्र, २०२२-२३ ते २०२५-२६ या चार वर्षांच्या अंतिम निवड याद्यांची पाहणी केली असता भजन, कीर्तन, भारूड, गोंधळ, ओवी गायन, वादक आदी कलाप्रकारांतील कलावंतांना संधी मिळाली. त्याचवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील भीमगीते, रमाईगीते, अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे तसेच आंबेडकरी प्रबोधन सादर करणाऱ्या कलावंतांना मात्र वगळण्यात आल्याचा दावा मानकर यांनी केला आहे. दरम्यान, २० ऑगस्ट २०२६ रोजी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यवतमाळ दौऱ्यावर आले असता, वगळण्यात आलेल्या ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांनी त्यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशासकीय बैठकीतही हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी युवराज मेहेत्रे यांनी वगळण्यात आलेल्या कलावंतांचा यादीत समावेश करण्याबाबत आश्वासन दिल्याचे मानकर यांनी सांगितले. मात्र, अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. "राजर्षी शाहू महाराज सामाजिक समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या नावाने राबविण्यात येणाऱ्या योजनेत महापुरुषांचे विचार समाजापर्यंत पोहोचविणाऱ्या कलावंतांना डावलले जात असेल, तर हा सांस्कृतिक अन्याय आहे," असे मानकर यांनी म्हटले आहे. मुलाखतीदरम्यान भीमगीते अथवा अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे सादर केल्यामुळे गुण देण्यात आले नसल्याचा आरोपही संबंधित कलावंतांनी आठवले यांना दिलेल्या निवेदनात केला असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाची पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने निष्पक्ष चौकशी करावी, गेल्या चार वर्षांतील निवड प्रक्रियेची तपासणी करावी आणि पात्र कलावंतांचा योजनेत समावेश करावा, अशी मागणी मानकर यांनी केली आहे. तसेच विद्यमान यादी रद्द करून नव्याने मुलाखती घेऊन निष्पक्ष यादी तयार करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास अन्यायग्रस्त कलावंतांना सोबत घेऊन आंदोलन छेडण्याचा इशारा रिपाइंच्या वतीने देण्यात आला आहे.

## दहीहंडीतील भाषणावरून एकावर गुन्हा

### माजी नगरसेवक सय्यद अफसर यांची तक्रार जातीय तेढ निर्माण केल्याचा आरोप

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**उमरखेड :** येथील सिद्धेश्वर दहीहंडी महोत्सवादरम्यान मुस्लिम समाजाविरुद्ध प्रक्षोभक भाषण केल्याच्या आरोपावरून हर्ष उर्फ हर्ष ठाकूर याच्याविरुद्ध उमरखेड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एमआयएमचे माजी नगरसेवक सय्यद अफसर सय्यद कासम यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर येथील कथित वक्ते हर्ष ठाकूर यांनी दहीहंडी महोत्सवात मुस्लिम समाजावर बहिष्कार टाकण्याचे तसेच आर्थिक व व्यावसायिक संबंध तोडण्याचे आवाहन केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या वक्तव्यामुळे दोन समाजांत जातीय तेढ निर्माण होऊन भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी पोलिसांनी एफआयआर क्रमांक ८९५/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील कलम १९६(१), २९९ आणि ३५३(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास उमरखेड शहर पोलिसांकडून सुरू आहे. दरम्यान, तक्रार दाखल करताना एमआयएमचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष सय्यद इरफान ताऊ, माजी नगरसेवक मुजीब बागवान, ॲड. सय्यद इलियास, अब्दुस्समद प्रिन्स, सय्यद गाझी यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. पोलिसांनी भाषणाची पार्श्वभूमी, उपलब्ध ध्वनिचित्रफिती, तक्रारीतील आरोपांच्या अनुषंगाने तपास सुरू केला आहे.

## गणेशोत्सवासाठी उमरखेड पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

### विसर्जन मार्गावर पथसंचलन; नागचौकात दंगल नियंत्रणाची रंगीत तालीम



प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**उमरखेड :** आगामी गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी उमरखेड पोलीस उपविभागाने कडेकोट बंदोबस्ताचे नियोजन केले आहे.

गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही, असा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे. सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी गौरव पाटील कार्यदे यांच्या मार्गदर्शनाखाली उमरखेड उपविभागातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यात आल्या. उत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषण टाळणे, मिरवणुकीत शिस्त राखणे, वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे तसेच सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्याच्या सूचना मंडळांना देण्यात आल्या. यवतमाळ जिल्ह्यात डॉल्बी साऊंड, टॉप-मिड-बेस मल्टीस्पीकर, प्लाझ्मा साऊंड, प्रेशरमिड साऊंड, लेझर लाईट आदी यंत्रणा वापरण्यासाठी किंवा वाहून नेण्यासाठी बदल केलेली वाहने सुरक्षित ठिकाणी सीलबंद ठेवण्याचे आदेश भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३(१) अन्वये जारी करण्यात आले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

#### विसर्जन मार्गांवर वॉच

■ गर्दीची ठिकाणे, संवेदनशील भाग, प्रमुख चौक आणि विसर्जन मार्गांवर विशेष नजर ठेवण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार अतिरिक्त पोलिस अधिकारी, अंमलदार आणि महिला पोलिस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करून गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

#### विसर्जन मार्गाची पाहणी

■ गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी विविध विसर्जन मार्गांवर पथसंचलन करून बंदोबस्ताचा आढावा घेतला. उमरखेड शहरातील नागचौक येथे दंगल नियंत्रण व आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याची रंगीत तालीम घेण्यात आली. अचानक परिस्थिती उद्भवल्यास पोलिस दल किती तत्परतेने प्रतिसाद देते, याचीही चाचणी घेण्यात आली.

## डोंगरखर्डा, मेटीखेडा परिसरात मोबाईल नेटवर्क कोलमडले

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**कळंब :** कळंब तालुक्यातील डोंगरखर्डा आणि मेटीखेडा परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून मोबाईल नेटवर्क सेवा विस्कळीत झाली आहे. त्यामुळे या परिसरातील सुमारे ४० ते ५० गावांतील नागरिकांना संपर्क साधताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. वारंवार निर्माण होणाऱ्या तांत्रिक समस्यांमुळे ग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. मोबाईलमध्ये नेटवर्कची पूर्ण क्षमता दिसत असतानाही प्रत्यक्ष कॉल करताना आवाज न येणे, कॉल मध्येच खंडित होणे तसेच फोन न लागणे, अशा समस्या सातत्याने उद्भवत आहेत. त्यामुळे नागरिकांची दैनंदिन कामे आणि महत्त्वाचे संपर्क खोळंबत आहेत. दरम्यान, या नेटवर्क समस्येचा परिणाम सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेवरही झाला आहे. परिसरातील अनेक स्वस्त धान्य दुकानांमध्ये धान्य वितरणासाठी वापरण्यात येणाऱ्या ई-पॉस यंत्रांना नेटवर्क मिळत नसल्याने वितरण प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी लाभार्थ्यांना धान्य मिळण्यासाठी ताटकळत राहावे लागत आहे. तांत्रिक समस्या सोडविण्याची मागणी गेल्या दोन महिन्यांपासून समस्या कायम असतानाही संबंधित यंत्रणेकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी मोबाईल नेटवर्क ही अत्यावश्यक सेवा बनली असून, वारंवार होणाऱ्या या व्यत्ययाची तातडीने दखल घेऊन तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, अशी मागणी डोंगरखर्डा, मेटीखेडा परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## पुस प्रकल्पातील पाण्याची व्यवहार्यता तपासणार

### आता शाश्वत पाण्याचा शोध; ब्राह्मणगावसह १३ गावांच्या योजनेचा फेरआढावा

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**यवतमाळ :** पुसद तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांचा फेरआढावा घेऊन उन्हाळ्यातही पाणी उपलब्ध राहील, अशा शाश्वत जलस्रोतांची निश्चिती करावी. ब्राह्मणगावसह १३ गावांसाठी पुस प्रकल्पातील जलसाठ्याचा उपयोग करता येईल का, याची तांत्रिक व्यवहार्यता तपासून प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांचा आढावा आणि ब्राह्मणगावसह १३ गावांसाठी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी राज्यमंत्री इंद्रनील नाईक, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटिया यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. सिंगरवाडी, उडती, औसापूर, पांडुरणा, ब्राह्मणगाव, शांपूर, वडगाव आदी गावांचा एकत्रित विचार करून एक किंवा दोन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य आहेत का, याचा अभ्यास करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या गावांमध्ये जिल्हा परिषदेमार्फत पाणीपुरवठा योजनांची कामे सुरू आहेत. मात्र, काही ठिकाणी विद्यमान जलस्रोत उन्हाळ्यात अपुरे पडण्याची शक्यता असल्याने पर्यायी शाश्वत जलस्रोतांचा अभ्यास करण्यास सांगण्यात आले. पुस प्रकल्पातील जलसाठ्याचा संबंधित गावांसाठी उपयोग करता येईल का, याची प्रत्यक्ष पाहणी करावी. गावांचे अंतर, भौगोलिक स्थिती, उंच-सखल प्रदेश, आवश्यक जलवाहिनी, उपलब्ध पाणीसाठा आणि भविष्यातील लोकसंख्येची पाण्याची गरज या बाबींचा विचार करून तांत्रिक अहवाल सादर करण्याचे निर्देश मंत्री पाटील यांनी दिले. विद्यमान पाणीपुरवठा योजनांमध्ये उभारलेल्या पायाभूत सुविधांचा शक्य तितका उपयोग करून अतिरिक्त खर्च टाळावा. आवश्यकतेनुसार योजनांचे पुनरीक्षण करून उपलब्ध पर्यायांचा विचार करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. शाश्वत स्रोत नसलेल्या गावांचा फेरआढावा जल जीवन मिशनअंतर्गत मंजूर आणि प्रगतीपथावर असलेल्या योजनांमधील जलस्रोतांची सद्यस्थिती तपासण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. ज्या गावांतील जलस्रोत शाश्वत नाहीत किंवा उन्हाळ्यात पाणी कमी पडते, अशा गावांसाठी पर्यायी जलस्रोत निश्चित करावेत. गरजेनुसार या गावांचा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेत समावेश करण्याचा प्रस्ताव सादर करावा, असे मंत्री पाटील यांनी सांगितले. गोंडमांजरीसाठी संतुलन टाकीचा विचार गोंडमांजरी येथील पाणीपुरवठ्याचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. उपलब्ध जलस्रोत, धरणापासूनचे अंतर आणि आवश्यक जलवाहिनी यांचा विचार करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांचा अभ्यास करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाणीटंचाईच्या काळात साठा उपलब्ध राहण्यासाठी आवश्यकतेनुसार संतुलन टाकी उभारण्याचे निर्देशही मंत्री पाटील यांनी दिले.

## वॉन्टेड आरोपीकडून देशी कट्टा जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; ५३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**यवतमाळ :** दिग्रस शहरात अवैधरित्या देशी कट्टा बाळगणाऱ्या वॉन्टेड आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. त्याच्याकडून देशी बनावटीचा कट्टा, एक जिवंत काडतूस असा ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रविण उर्फ पवन सुदाम जाधव (३०, रा. पार्वतीनगर, पुसद) असे आरोपीचे नाव आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडून विशेष पेट्रोलिंग व पाहीजे आरोपींचा शोध सुरू आहे. १५ सप्टेंबर रोजी पोलीस उपनिरीक्षक शिवशंकर कायंदे यांच्या नेतृत्वाखालील पथक दिग्रस परिसरात गस्त घालत असताना जाधव हा देशी कट्टा घेऊन जुना दारव्हा रोड परिसरात फिरत असल्याची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा केल्यानंतर पथकाने जुना दिग्रस-दारव्हा मार्गावरील अंश मंगल कार्यालयाजवळील ज्येष्ठ नागरिक निवारा परिसरात सापळा रचला. जाधव याला ताब्यात घेऊन पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याच्या पँटच्या डाव्या खिशातून देशी बनावटीचा कट्टा मिळाला. कट्ट्याच्या बॅरलमध्ये एक जिवंत काडतूस आढळून आले. त्याच्याकडे अग्निशस्त्र बाळगण्याचा परवाना नसल्याचेही स्पष्ट झाले. जप्त केलेल्या कट्ट्याची अंदाजे किंमत ५० हजार, तर जिवंत काडतुसाची किंमत तीन हजार रुपये आहे. जाधव हा दिग्रस पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ३७८/२०२२, कलम ३७९ अन्वये दाखल गुन्ह्यात पसार असून पाहीजे आरोपींच्या यादीत होता.



या प्रकरणी दिग्रस पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ च्या कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कट्टा कोठून मिळविला, त्याचा पुरवठा कोणी केला आणि या अग्निशस्त्राचा अन्य गुन्ह्यांमध्ये वापर झाला आहे का, याचा तपास सुरू आहे. कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. पोलीस उपनिरीक्षक शिवशंकर कायंदे यांच्यासह अंमलदार सोहेल मिर्झा, मिथुन जाधव, कुणाल मुंडोकार, सचिन मलाये, पवन ढवळे, चालक जितेंद्र चौधरी यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# सेवा संकल्प अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अमरावती :** नागरिकांच्या सोयीसाठी आणि गरजूंना लाभ देण्यासाठी सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संसदीय कार्यकाळाला 25 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने हे अभियान एक महिनाभर राबविण्यात येणार आहे. नागरिकांच्या जीवनात बदल घडून येईल, अशा योजना या अभियानात राबविण्यात यावा, तसेच अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा संकल्प अभियानामध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी . येरेकर यांनी, जिल्ह्यात प्रामुख्याने वन हक्क पट्टे वाटपाचा कार्यक्रम धारणी आणि चिखलदरा तालुक्यात प्राधान्याने राबविण्याचे निर्देश दिले. दि. 17 ते 19 सप्टेंबरदरम्यान प्रत्येक गावात सभा घेऊन वनपट्टे वाटप निश्चित करावे. त्यानंतर दि. 20 सप्टेंबरपासून प्रत्यक्ष कारवाई करावी. ग्रामसभा, उपविभाग आणि जिल्हास्तरीय समितीची मंजुरी घेऊन या अभियानात पट्टेवाटप अंतिम करण्यात यावे. तसेच नव्याने तयार करण्यात आलेला सात ई आणि बारा ईबाबत कार्यवाही करण्यात यावी.

अभियानात राशनबाबत कार्यवाही करण्यात यावी. यात लाभार्थ्यांशी संवाद साधून आवश्यक नसलेल्या नागरिकांना लाभ सोडण्याचे आवाहन करण्यात यावे. धान्य नको असलेल्या नागरिकांकडून लेखी घ्यावे, तसेच गरजूंची नावे समाविष्ठ करण्यात यावी. तसेच आयुष्मान कार्ड आणि वयोवंदन योजनेत प्राधान्याने कामे करण्यात येणार आहे. यासोबतच शासकीय कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. मेळघाटात प्रामुख्याने ही शिबीरे आयोजित करण्यात येतील.

युवकांसाठी 29 सप्टेंबर रोजी सर्व तालुक्यात रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहे. यात 1800 जागा भरण्यात येणार असून यासाठी 56 कंपन्यांनी नोंद केली आहे. आतापर्यंत 5 हजार युवकांनी यासाठी नोंदणी केली आहे. त्यासोबतच समाज कल्याण आणि आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहात करीअर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कामगार विभागातर्फे असंघटीत कामगारांसाठी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्यात येणार आहे. त्यांच्यासाठी आरोग्य शिबीर, विमा आदी उपक्रम राबविण्यात येणार आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना बँकेत पगार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

अभियान विविध विभागांच्या समन्वयातून राबविण्यात येणार आहे. सर्व विभागांची जबाबदारीने कार्यक्रमाचे नियोजन करून राबवावे, तसेच याचा अहवाल सादर दर आठवड्याला सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिले.

# भाजपा बुध्दीजीवी आघाडीच्या प्रदेश सहसंयोजक पदी शेतकरी नेते अरविंद ऊर्फ बाबुजी नळकांडे यांची निवड

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**दर्यापुरः** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेत्रुत्वात राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश यांचे मार्गदर्शनात; भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण;यांचे सुचनेनुसार बुध्दीजीवी प्रकोष्ट चे प्रभारी विश्वास पाठक यांनी राज्याच्या बुध्दी जीवी संयोजकासह सहसंयोजकांची घोषणा नुकताच केली.

यानुसार या प्रकोष्टचे प्रदेश सह संयोजक म्हणुन अरविंद ऊर्फ बाबुजी ऩळकांडे यांची निवड करण्यात आली.

स्वातंत्र्योत्तर केन्द्रीय सत्तेत आलेल्या राज्यकर्त्यांनी राबविलेल्या समाजवादी अर्थविषयक धोरणांचे भोग सध्याही देश भोगतो आहे!

देश वासीयांना गर्ततेचे जीवन जगण्यास भाग पाडण्यात कारणीभुत ठरलेली ही ७० वर्ष पुरानी समाजवादी "मदत धार्जीणी"व्यवस्था, त्यासाठी ऊभे करण्यात आलेले शेकडो कायदे,व विविध शेकडो संरचना निस्तनाबुत करुन, नव्या "गुंतवणुक धार्जीण्या" धोरणांनी देशाचा विकास करण्याचा



संकल्प, २०१४ साली नव्याने सत्तेत आलेल्या नरेन्द्र मोदीजींच्या सरकारने केला व त्याद्रुष्टीने कांही क्रान्तीकारक पावलेही गत १२ वर्षात टाकली आहेत!

अजुन कांही पाऊले टाकणे अपेक्षीत आहेत!

या नव्या पावलांचे सु परीणाम सर्व क्षेत्रात दिसायला लागले आहेत. जुन्या समाजवादी धोरणांच्या दुष्परीणामामुळे श्रमजीवी समाज य़ा शोषण व्यवस्थेच्या विरुध्द संघर्ष करण्यासाठी रस्त्यावर ऊतरु नये,याची काळजी म्हणुन,त्यांना सतत कांही तरी मदत,कर्जमाफी,अनुदान देण्याचा जुना परिपाठ होता.

शेतीक्षेत्रासह, विविध क्षेत्रातील समाज घटकांची साहाजिकच, सरकारी तिजोरीतुन सतत कांहीतरी मदत मिळावी अशी जडन घडन बनली होती!

किंबहुना ही अशी "मदत" "दानधर्म" देणारा राज्यकर्ता म्हणजेच आपला हितकर्ता(?) सत्ताधारी असेच समाज मन बनले होते.

केवळ स्वस्त लोकप्रियता मिळवुन सत्तेत येणे,या सालोसालच्या "मदत धार्जीण्या"गोरख धंद्याला देशाचे ईतिहासात पहील्यांदा छेद देऊन,नव्या "गुंतवणुक धार्जीण्या" व्यवस्थेच्या अंमलबजावणीतुन, समाज हीत साधण्याचा संकल्प २०१४ साली सत्तास्थानावर आलेल्या नरेन्द्र मोदी सरकारने केला.

त्यासाठी २०२२ पर्यंतचा कालावधी नरेन्द्र मोदीजींनी देशवासीयांना मागीतला, व देशवासीयांनी तो त्यांना दिलाही आहे. पण त्या आधीच नव्या धोरणां बाबत समाजात,गैरसमज पसरवत,त्यांना भडकवत आपली राजकारणाची पोळी भाजण्याचा धंदा तथाकथीत नेते; तज्ञ; विचारवंतापासुन ते मिडीयाकर्मी पर्यंत सर्व करीत आले आहेत-

या तथाकथीतांपासुन सकल समाजाला सावध करण्याचे कार्य हा बुध्दीवादी प्रकोष्ट राज्यभर करणार आहे.

# पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे दीक्षांत कार्यक्रम व माजी विद्यार्थी समारोह

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अमरावती:** पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर महाविद्यालयात अभियंता दिनाचे औचित्य साधून दीक्षांत समारोह व माजी विद्यार्थी संमेलन आयोजित करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, अमरावती येथील जेष्ठ आर्किटेक्ट नितीन कदम व पी .आर. पोटे पाटील शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनुप्रिता देशमुख यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे आयोजन डिग्री व डिप्लोमा च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे केले.



याप्रसंगी विद्यार्थ्यांनी दीक्षांतासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची सभागृहात भव्य प्रवेश दिंडी आयोजित केली. तसेच प्राचार्य संजय देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये सदर पदवी वितरण कार्यक्रम विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयाकडून करण्यात येत आहे व यास माजी विद्यार्थी भेट जोडल्याने नव्याने उत्तीर्ण वास्तुशास्त्र विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थ्यांच्या अनुभव व कौशल्याचा लाभ मिळतो असे प्रतिपादन केले. तसेच हे सर्व घटक मूळ महाविद्यालयात या निमित्ताने एकत्र येतात व आनंदाचे वातावरण महाविद्यालयीन परिवारात निर्माण होते असे नमूद केले. यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी वास्तुशास्त्र परिषद नवी दिल्ली, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती , इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट मुंबई व पी आर पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अमरावती यांचेकडून शिक्षणादरम्यान प्रसृत झालेली मूल्ये जपण्याचा सतत प्रयत्न करू अशी शपथ घेतली.

त्यानंतर परीक्षेत मागील तीन वर्षातील बी आर्क च्या परीक्षेत अव्वल आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने २०२५ तुकडीतून संपूर्ण विद्यापीठातून द्वितीय आलेल्या साक्षी देशमुख हिचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच मागील तीन तुकडीतील गौरव गुप्ता, पारस तलरेजा ,कृष्णा गीते, रजत बोहरा व कृष्णा जयस्वाल या महाविद्यालयातून अव्वल आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार झाला.

# अमरावतीत 22 वर्षीय तरुण डॉक्टरचा गूढ अंत!

## आई-वडिलांनी दिली धक्कादायक माहिती; व्हिसेरा रिपोर्टनंतर उलगडा होणार

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अमरावती:** नाशिक येथून वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून नुकतीच बी.ए.एम.एस.ची पदवी घेतलेल्या एका २२ वर्षीय तरुण डॉक्टराचा झोपेतच संशयास्पद मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना अमरावतीतून समोर आली आहे. या तरुण डॉक्टराचा मृतदेह उलटा अवस्थेत आढळला आहे. तसेच त्याच्या डोळ्यातून रक्त येत असल्याचीही धक्कादायक माहिती समोर आली आहे. अशा भयावह अवस्थेत तरुण डॉक्टरचा मृत्यू झाल्यानं परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

आदित्य रावटे असं मृत पावलेल्या तरुण डॉक्टरचं नाव आहे. ही घटना अमरावती



जिल्ह्यातील वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात घटना घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी रवाना झाले आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करत आदित्यचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत आदित्यला लहानपणापासूनच अपस्माराचा (फिट) त्रास होता. याशिवाय स्वतःचा रंग गोरा करण्यासाठी तो स्वतःवरच काही औषधांचे प्रयोग करत उपचार घेत होता, अशी माहिती त्याच्या आई-वडिलांनी पोलिसांना दिली आहे. याच औषधांचा ओव्हरडोस झाल्यामुळे त्याचा जीव गेला असावा, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. आदित्य त्याच्या खोलीत उलटा अवस्थेत मृतदेह पडलेला आढळला आहे. तसेच त्याच्या डोळ्यांतून रक्त येत असल्याचं दिसून आलं आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन विच्छेदनासाठी पाठवला. प्राथमिक शवविच्छेदन अहवालानुसार, गुदमरल्यामुळे आणि हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने हा मृत्यू झाल्याचा अंदाज वैद्यकीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. मात्र, आदित्यचा मृत्यू गोरा होण्याच्या औषधांच्या विषबाधेमुळे झाला की अपस्माराच्या आजारामुळे? याचा खरा उलगडा व्हिसेरा तपासणी आणि सविस्तर शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच होणार आहे. या प्रकरणी वलगाव पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक रिता उईके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, या घटनेनं संपूर्ण अमरावतीत एकच खळबळ उडाली आहे. लेकराच्या मृत्यूनंतर आई-वडिलांनी एकच हंबरडा फोडला.

# भरती परीक्षा पद्धतीत सुधारणा : आज उच्च स्तरीय टास्क फोर्स शहरात

## अमरावती विभागातील सर्व घटकांना सक्रिय सहभाग नोंदविण्याचे प्रशासनाचे आवाहन

**अमरावती :** अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय टास्क फोर्स गुरुवार, 17 सप्टेंबर रोजी भरती परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सूचना व अभिप्राय जाणून घेण्याकरिता अमरावती विभाग दौऱ्यावर येत आहे. या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत अमरावती विभागातील सर्व घटकांनी उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे. ही समिती जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे 17 सप्टेंबर रोजी सकाळी 11 ते दुपारी 5.30 अमरावती विभागातील हितधारकांच्या सूचना व अभिप्राय ऐकूण घेत त्यांच्याशी चर्चा करणार आहे. विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून टास्क फोर्स समोर आपले विचार मांडण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापित विशेष कक्षात प्रत्यक्ष तसेच ईमेलद्वारे सूचना, शिफारशी, हरकती व अभिप्राय यापूर्वीच मागविण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त होणाऱ्या सर्व सूचनांचे संकलन करून उच्चस्तरीय टास्क फोर्सकडे सादर करण्यात येतील. राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित असलेल्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत अमरावती विभागातील सर्व घटकांनी उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

# गणेश मंडळाच्या माध्यमातून शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी लोकसंवाद अभियान

## आजपासून अमरावती जिल्ह्यात उपक्रमास सुरुवात

**अमरावती :** महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय अमरावती आजपासून 'लोकसंवाद-2026' हा विशेष जनजागृती उपक्रम शहरातील ऐतिहासिक आझाद हिंद गणेशोत्सव मंडळापासून प्रारंभ करीत आहे. राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले असून, या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येणाऱ्या गणेश मंडळाच्या ठिकाणी लोकसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शासनाच्या योजनांची माहिती देण्याबरोबरच नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधणे, आणि पात्र लाभार्थ्यांना संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, या प्रमुख उद्देशाने राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम 16 ते 24 सप्टेंबर 2026 या कालावधीत राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यात या उपक्रमाची सुरुवात अमरावती शहरातील बुधवारा येथील ऐतिहासिक आझाद हिंद गणेशोत्सव मंडळापासून होत आहे. या मंडळात 16 सप्टेंबर रोजी सायंकाळी 7 वाजता लोकसंवाद उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत मृद व जलसंधारण विभाग आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,अमरावती यांच्या तर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध योजना व उपक्रमांची माहिती देण्यात येणार आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात येणार आहे.

# अमरावती भाजपा शहर जिल्ह्याच्या वतीने सेवा संकल्प अभियान



**अमरावती :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त अमरावती भाजपा शहर जिल्ह्याच्या वतीने दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील सेवा, सुशासन आणि जनकल्याण या भावनेला केंद्रस्थानी ठेवून या अभियानाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून लोकसेवेचे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या अभियानाच्या कालावधीत पक्षाच्या विविध आघाड्या, मोर्चे, मंडळे तसेच बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांच्या सहभागातून विविध सामाजिक व सेवाभावी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यामध्ये आरोग्य तपासणी व आरोग्य शिबिरांचे आयोजन, रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरणाशी संबंधित उपक्रम, युवा व विद्यार्थी केंद्रित सामाजिक उपक्रम, जनसंवाद आयोजित करण्यात येणार आहे. या सर्व सेवाभावी उपक्रमांमध्ये अमरावती शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. नितीन धांडे यांनी केले आहे.

# राज्य कामगार विमा योजना अतंर्गत सेवा संकल्प अभियानाचे आयोजन

**अमरावती :** महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली राज्य कामगार विमा योजना आयुक्तालयाच्या आदेशानुसार वैद्यकीय प्रशासन अधिकारी कार्यालय अमरावती अंतर्गत सर्व सेवा दवाखान्यामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरपर्यंत सेवा संकल्प अभियान राबविले जाणार आहे. या अंतर्गत विमाधारक व त्यांच्या कुटुंबीयांना या सेवा संकल्प अभियानाअंतर्गत आरोग्य तपासणी उपचार, जनजागृती तसेच विविध आजाराविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे.

यात प्रामुख्याने वृक्षारोपण, रक्तदान व अवयवदान जागरुकता शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, योग व ध्यान शिबिर, स्वच्छता शिबिर, व्यसनमुक्त भारत जनजागृती शिबिर, महिलांचे आरोग्य व स्वच्छता, पोषण व ॲनिमिया जनजागृती शिबिर, बालरोग शिबिर अशा विविध उपक्रमांचा समावेश या सेवा संकल्प अभियानामध्ये आहे.

वैद्यकीय प्रशासन अधिकारी डॉ. प्रिती काटे, प्रशासन अधिकारी डॉ.राजनारायण गोमासे, सर्व सेवा दवाखान्यातील प्रभारी विमा वैद्यकीय अधिकारी, तसेच वैद्यकीय प्रशासन अधिकारी कार्यालयातील श्रीमती स्नेहा बारसागडे (अधिपरिचारीका), श्री. योगेश कोल्हे (वरिष्ठ लिपिक) व इतर कर्मचारी या संपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन व नियोजन पार पाडणार आहेत. सदर सेवा संकल्प अभियानाचा लाभ सर्व विमाकामगार व त्यांच्या कुटुंबीयांनी घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय प्रशासन अधिकारी कार्यालय, अमरावती तर्फे करण्यात आले.

# श्री. गणेशाची व्रते प्रामुख्याने संकटे दूर करण्यासाठी, सुख - समृद्धी आणि बुद्धीच्या प्राप्तीसाठी करतात - आमदार सुलभा खोडके

## गणेश अथर्वशीर्ष ', 'संकटनाशन गणेश स्तोत्र ' आणि ' ॐ गं गणपतये नमः ' चा सामूहिक जप करीत अर्जुन नगर व अमृतविश्व वसाहत येथे गणरायाची आराधना

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अमरावती:** आपल्या भारतीय समाजाचे एक श्रद्धास्थान म्हणजे गणपतीबाप्पा. कार्यारंभी श्रीगणेशाला नमन केले जाते. निर्विघ्नपणे कार्य पार पडावे यासाठी श्रीगणरायाचे पूजन करतात. गणपती देवतेसंबंधी विविध व्रते, नवस, उपवास असे करण्याचा प्रघात अनेक ठिकाणी स्त्री - पुरुष पाळतात. संकष्टी चतुर्थी व्रत, अंगारकी चतुर्थी व्रत, विनायकी चतुर्थी व्रत, गणेश जयंती माघ महिन्यातील शुद्ध चतुर्थी, अथर्वशीर्ष सहस्त्रावर्तन व्रत, सहस्त्र मोदक अर्पण व्रत, गणेश याग व्रत, दुर्वा गणपती व्रत,



सिद्धिविनायक व्रत, वरदा चतुर्थी व्रत, सार्वजनिक गणेशोत्सव भाद्रपद शुद्ध चतुर्थीचे अनंत चतुर्दशीपर्यंत दहा दिवस असे व्रत.' व्रत ' म्हणजे एखादा संकल्प करून, नियमांचे पालन करत केलेली धार्मिक उपासना. श्री गणेशाची व्रते प्रामुख्याने संकटे दूर करण्यासाठी, सुख - समृद्धी आणि बुद्धीच्या प्राप्तीसाठी करतात.मनाचा संयम आणि सात्विक वर्तनविचार अंगीकारित लोकल्याणकारी असा संकल्प करून गणेशभक्ती केली की हा बुद्धीदाता आपल्यावर प्रसन्न होतो. हा अनुभव घेण्यासाठीच समाजात ' व्रते ' अधिक प्रमाणात केली जातात. असे प्रतिपादन आमदार - सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले. बुधवार दिनांक 16 सप्टेंबर 2026 रोजी अर्जुन नगर स्थित कृषी मित्र परिवार गणेशोत्सव मंडळ तसेच अमृतविश्व वसाहत स्थित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. महाराष्ट्रासह देशभरात सोमवारपासून गणेशोत्सवाला मोठा थाटात सुरुवात झाली. दरवर्षी अवघ्या अमरावतीसह आजूबाजूच्या भागातील भाविकांचे आकर्षण आणि श्रद्धास्थान असलेल्या या दोन्ही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील विघ्नहर्ता श्री लंबोदराच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. अशातच बुधवारी आमदार सुलभा खोडके व यश खोडके यांनी या मंडळाच्या स्थळी भेट दिली.सर्वप्रथम कृषि मित्र परिवार गणेशोत्सव मंडळ येथे आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी भेट देऊन वरद विनायकाचे दर्शन घेऊन कृपाशीर्वाद घेतलेत. यावेळी सुलभाताई खोडके व यश खोडके यांनी श्रीगजाननाच्या चरणी दुर्वा, जास्वंदाचे लाल फुलं आणि शमीची पाने अर्पण करीत नतमस्तक होऊन गणपती बाप्पाची आराधना व उपासना केली. याप्रसंगी निर्गुण, निराकार, परब्रम्ह परमात्मा स्वरूप असणाऱ्या भगवान श्री गणेश यांच्या प्रतिमेस वंदन - नमन - पूजन व माल्यार्पण करून त्यांनी सर्व भक्तांना संकटांपासून मुक्ती व इष्ट फलप्राप्तीसाठी शिवपुत्राच्या चरणी मनोमन प्रार्थना केली. यावेळी कृषी मित्र परिवार गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकारिणीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी आमदार - सौ. सुलभाताई खोडके व यश खोडके यांचा शाल - श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तदनंतर आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी अमृतविश्व वसाहत परिसर स्थित अमृतविश्व गणेशोत्सव मंडळ येथे पार्वतीपुत्र गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी आमदार - सौ. सुलभाताई खोडके व यश खोडके यांच्या हस्ते गणपती बाप्पाची आरती करण्यात आली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि. १७ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## आज पासुन स्वच्छता ही सेवा अभियान

**वाशीम :** जिल्ह्यात १७ सप्टेंबर पासुन २ ऑक्टोबर म. गांधी जयंती पर्यंत 'स्वच्छता ही सेवा' हे अभियान राबविण्यात येणार आहे. स्वच्छ व विकसित भारताच्या उभारणीसाठी केवळ प्रशासनाचे प्रयत्न पुरेसे नाहीत, तर गावागावांतील प्रत्येक नागरिकाचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अर्पित चौहान (भाप्रसे) यांनी केले असून, जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना हे अभियान लोकचळवळ म्हणून राबविण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. 'स्वच्छतेमध्ये सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत' ही या वर्षीच्या अभियानाची संकल्पना असुन या दरम्यान गावोगावी अस्वच्छ व अडचणीच्या ठिकाणांचे सर्वेक्षण करून त्यांची स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन केंद्रांना भेटी, शाळा-महाविद्यालयांतील स्वच्छता ज्ञानयात्रा, सफाईमित्र व स्वच्छता कामगारांसाठी आरोग्य तपासणी व सन्मान शिबिरे, वृक्षारोपण, कचरा वर्गीकरणाबाबत घरोघरी जनजागृती तसेच 'वेस्ट टू वेल्थ' व 'वेस्ट टू आर्ट' यांसारखे उपक्रम राबविले जाणार आहेत.

# कोरडा दुष्काळाच्या मागणीसाठी...

# शिवसेनेचा आक्रोश मोर्चा !

## आ. नितीन देशमुख यांची वाशीम येथे पत्रकार परिषदेत माहिती

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

पश्चिम विदर्भात पावसाअभावी पिके वाळली आहेत. त्यामुळे वाशिम, अकोला, बुलढाणा (घाटाखाली, घाटावर), अमरावती व यवतमाळ जिल्ह्यात शिवसेनेकडून (उबाठा) जन आक्रोश मोर्चे काढण्यात येणार आहेत. या मोर्चांची सुरुवात वाशिम येथून २१ सप्टेंबर पासून होणार असून, त्यानंतर उर्वरित जिल्ह्यात मोर्चे काढण्यात येणार आहेत. जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करणे, सरसकट आर्थिक मदत देणे, दुष्काळी उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी ची मागणी केली जाणार आहे, अशी माहिती शिवसेना उपनेते ताथा आमदार नितीनबापू देशमुख यांनी दिली.

वाशिम येथील विश्रामभवन येथे १६ सप्टेंबर रोजी शेतकरी जन आक्रोश मोर्चा संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत माहिती देताना बोलत होते. यावेळी त्यांनी पश्चिम विदर्भात पावसाअभावी कृषिक्षेत्रावर आलेले संकटावर लक्ष वेधले. शिवसेनेच्यावतीने काढण्यात येणाऱ्या पश्चिम विदर्भातील जन आक्रोश मोर्चाची सुरुवात ही वाशिम येथून २१ सप्टेंबर रोजी होणार आहे. त्यानंतर पश्चिम विदर्भातील सर्व जिल्ह्यांत शिवसेनेकडून जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी सरकारने तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे, पीकविम्याचे पुर्वी असलेले ४ ट्रिगर रद्द केलेत ते पूर्ववत करून नुकसानभरपाई देणे, रब्बी हंगामासाठी बियाणे व खते मोफत देणे, सिंचनाची सुविधा असलेल्या ठिकाणी कृषी पंपाना सुरळीत वीजपुरवठा द्यावा, नियमित पीक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेत २ लाख रूपये प्रोत्सानपर अनुदान द्यावे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी



योजनेत पुर्नगठन केलेल्या सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी चा लाभ द्यावा, जनावरांना चारा, पाणी उपलब्ध करून दयावा किंवा चारा छावण्या सुरु कराव्यात, वाशिम जिल्ह्यातील विहीर, घरकुल आणि रस्ते यांचे मस्टर चालू करणे आदि मागण्यांसाठी जन आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे, जिल्हा सह संपर्कप्रमुख डॉ. सुधीर कवर, जिल्हा संघटक गजाननराव देशमुख, जिल्हा समन्वयक डॉ. सिद्धार्थ देवळे, लोकसभा संघटक कॅप्टन प्रशांत सुर्वे, , महिला जिल्हा संघटिका प्रियाताई महाजन, उपजिल्हाप्रमुख सचिन परळीकर उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील राऊत, उपजिल्हाप्रमुख संतोष सुर्वे उपजिल्हाप्रमुख दत्ता पाटील तुरक सहसंपर्कप्रमुख विवेक नाकाडे, विधानसभा प्रमुख बंडूभाऊ वैद्य , विधानसभा समन्वयक रवी पाटील राऊत विधानसभा संघटक पांडुरंग पांढरे, विधानसभा समन्वयक सुभाष बोरकर वाशीम तालुका प्रमुख, गणेश इंगोले, मालेगाव तालुका प्रमुख उद्धव गोडे, मगरुळपीर तालुकाप्रमुख ,अर्जुन सुर्वे, रिसोड तालुकाप्रमुख, घनश्याम मापारी, वाशिम तालुका संघटक, आनंदा पाटील काळे, गजानन बोरचाटे भागवत शिंदे नारायण आरु भगवान बोरकर विजय शेडगे, प्रशांत लोखंडे गणेश सरनाईक, शहर संपर्क प्रमुख गजानन भादुर्गे शहरं प्रमुख गजानन जोगदंड, शहरंप्रमुख, कारंजा राजु ठाकरे, रमेश घुगे, सुभाष शिंदे संदीप पान भगत नरेंद्र भोयर बंडू शिंदे युवा सेना, उपजिल्हाप्रमुख, रामहारी सावके, नगरपरिषद उपाध्यक्ष ,राजु भांदुर्गे, नगरपरिषद गटनेते गजानन दहात्रे, नगरसेवक, भावेश गोरे, नामदेव हजारे, अमोल इंगोले, पुरणसेठ बदलांनी, रोहीत बढैल साबिर मिर्झा विशाल काळे, शेख नुर, आशिष इंगोले विठ्ठल चौधरी, उपतालुकाप्रमुख, शंकर सावके दीपक ईडोळे पवन वाघ, गजानन मुसळे, सर्कल प्रमुख, संजय ठोंबरे मोहन एकाडे, निरंजन गावंडे, निलेश वानखेडे, माणिक कव्हर, दिलीप शिंदे, शिवाजी मार्गे, विनोद वारकड, आकाश गंगावणे, संतोष माने, शुभम मुसळे अमण अवचार ते अविनाश गव्हाणकर, उपशहर प्रमुख, देवा वानखडे, आकाश जाधव, रामचंद्र इंगळे, समीर मांजरे, राजु काळे, बबन वाघमारे, दिपक वानखेडे सर्व उपतालुकाप्रमुख ,सर्व सर्कल प्रमुख ,सर्व , उपसर्कल प्रमुख महादेव महाले हरिदास कोरडे शिंदे विठ्ठल शिंदे रामू पाटील अशोक काकडे गजानन गिरी गजानन इंगोले, उद्धव ढेकळे प्रकाश अपूर्वा शाखाप्रमुख विभाग प्रमुख आदींची उपस्थिती होती.

## थोडक्यात

### क्षयरोग, एड्स तपासणी शिबीर




• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

प्राथमिक आरोग्य केंद्र शेलुबाजार येथे जिल्हा क्षयरोग केंद्र वाशीम मार्फत संशयित क्षयरुग्नाची डिजिटल एक्स रे मशीनद्वारे तपासणी करण्यात आली.तालुका आरोग्य अधिकारी डॉ धनश्री जाधव, वैद्यकिय अधिकारी डॉ देवकी सोनभोयर यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी शिबिराचे नियोजन केले.क्ष किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी ४२ संशयिताचे एक्स रे काढले. यावेळी उपस्थित रविंद्र दाभाडकर, वैशाली मोहाडे, सौरभ अंभोरे, वैभव दिवाने, गणेश राऊत, प्रशांत तूरक, गजानन बायस्कार तसेच आशा कार्यकर्ती उपस्थीत होत्या.यावेळी ३५ संशयीतांचे स्पुटम गोळा करण्यात आले.लिंक वर्कर मिलिंद खंडारे यांनी २० व्यक्तीची एच आय व्ही तपासणी केली ङआरोग्य उपकेंद्र पेडगावङ येथे हॅन्ड हेल्ड एक्स रे मशीनद्वारे टेक्निशियन कार्तिक शिरसाठ यांनी ५८ संशयितांचे एक्स रे काढले तसेच ५५ स्पुटम गोळा करण्यात आले.समुदाय आरोग्य अधिकारी डॉ सुजाता हिंगोले यांचे मार्गदर्शनाखाली सुभाष शेळके, विष्णू कराळे, संतोष बल्लाळ, जोशना मते, मनिष जाधव तसेच आशा कार्यकर्ती उपस्थित होत्या.सर्व उपस्थितांना क्षयरोग, डेंग्यू, एड्स बाबत आरोग्य शिक्षण करण्यात देण्यात आले.

## राजुरा ग्रामस्थांची तहसील कार्यालयावर धडक !

*पिक नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी
*तहसीलदारांना दिले निवेदन

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

मालेगाव - तालुक्यातील राजुरा परिसरात गेल्या ४० दिवसां पासून पावसाचा खंड पडल्या मुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, या मागणी साठी शेतकऱ्यांनी निवासी नायब तहसीलदार रंजना गोरे यांना १६ सप्टेंबर रोजी निवेदन दिले .

गेल्या काही दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे राजुरा-सुदी, अनसिंग, शिवारातील सोयाबीन, कापूस, तूर इत्यादी पिक. पावसा अभावी करपु लागली आहेत. तर दुसरीकडे पावसाने लांब दडी मारल्याने काही पिके माना टाकू लागली आहेत. कोरडा दुष्काळा मुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. हातोंडाशी आलेले पीक वाया गेल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. बँकेचे कर्ज, बियाणे, खते यासाठी केलेला खर्चही निघणार नाही अशी परिस्थिती आहे. आज राजुरा येथील शेतकऱ्यांनी एकत्र येत तलाठी, मंडळ अधिकारी



आणि तहसीलदार यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, तात्काळ राजुरा शिवारात कृषी सहाय्यक आणि तलाठी यांनी संयुक्त पाहणी करून पंचनामे करावेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविमा आणि शासकीय मदत तात्काळ जाहीर करावी.

पंचनामे करताना कोणत्याही शेतकऱ्याला न वगळता सरसकट पंचनामे करण्यात यावे जर लवकर पंचनामे झाले नाहीत तर आम्हाला तहसील कार्यालयासमोर आंदोलन करावे लागेल' असा इशारा देखील शेतकऱ्यांनी दिला आहे.यावेळी मनोज मोहळे, ॲड नरेंद्र अढाव, शिवाजी सोनोने, शिवाजी खराटे, प्रतीक राजुरकर, नागेश गावंडे, अनीस पठाण, वसंता गोरे, माणीक अकोटकर, वाजीदखॉ पठाण, एकनाथ टोंचर, नारायण ढोबळे, नामदेव टोंचर, गोकुल पुरूषोत्तम, गंगाधर भगत, धम्मपाल इंगळे, उध्दव वानखेडे, गजानन गायकवाड, बळीराम सानप, गणेश काळे, सोपान मोहळे, नामदेव घुगे, सुनील आढाव, आकाश आढाव, इद्रीसखा पठाण, महादेव टोंचर यांच्या सह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

## गणेश मंडळांच्या माध्यमातून 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रम !

### गणेशभक्त व नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचा पुढाकार

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकारातून 'श्रीगणेशा आरोग्याचा' हा विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत गणेश मंडळांच्या माध्यमातून गणेशभक्त आणि स्थानिक नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालय व जिल्हा आरोग्य यंत्रणा तसेच धर्मदाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टरांचा सहभाग आहे. गणेश मंडळांच्या मंडपांमध्ये किंवा परिसरात आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून, नागरिकांना विविध शासकीय आरोग्य योजनांची माहिती व मार्गदर्शन देण्यात येणार आहे.

## जगण्याची कळ , महागाईची झळ !

### बांधकाम साहित्यासह जीवनावश्यक वस्तूचे दर गगनाला

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जीवनाश्यक वस्तूचे दर गगनाला भिडले. व महागाईची आग झपाट्याने पेटत आहे. त्यामुळे महागाईची झळ अन् जीवनाची कळ होत आहे. इंधन दरवाढीने जीवनावश्यक वस्तुचे दर गंगनाला पोहोचले आहेत. बांधकाम साहित्याच्या दरवाढीमुळे सर्व सामान्यांचे घराचे स्वप्ने अधुरेच राहत आहेत.

सध्या सणसुदीचे दिवस असून बाजारपेठेत सर्वच जीवनावश्यक वस्तु सह भाजीपाल्याचेही दर भरमसाठ वाढले आहेत. ग्राहकांची वर्दळ आहे. ग्राहकाच्या या उत्साहामुळे बाजारपेठ फुलल्या आहेत. शहरातील मोठ्या बाजारात सुवर्ण झळाळी असल्याचे चित्र दिसते. शेंगदाणे तेलाच्या दरात किलोमागे सरासरी ३० ते ४० रुपयांची वाढ झाली आहे. बाजारपेठेमध्ये गुळ, नारळ, हरभरा आणि तेलाची मोठी आवक झाली आहे. मात्र ग्राहकांना दरवाढीची झळ बसली आहे.



घर बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या भावात दुप्पट तिप्पट वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना घरबांधणे आवक्याच्या बाहेर झाले आहेत. २०२२ पर्यंत सर्वांना घरे देण्याचे मोदी सरकारचे आश्वासन हवेतच विगळले. इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तुत अचाणक वाढ झाली आहे.

## लघुपाटबंधारे विभागाचा भोंगळ कारभार !

### अवघ्या काही वर्षांत कुकसा धरणाच्या सांडव्याच्या भिंतीला भलेमोठे भगदाड; दुरुस्तीअभावी धरणाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

• प्रभाकर नाईकवाडे @ केनवड •

रिसोड तालुक्यातील कुकसा लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या सांडव्याच्या भिंतीला भलेमोठे भगदाड पडल्याचे समोर आले असून, धरणाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अवघ्या काही वर्षांतच सांडव्याच्या भिंतीची अशी अवस्था झाल्याने बांधकामाच्या दर्जावर आणि देखभाल-दुरुस्तीच्या कामावर शेतकरी व नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.




सिटी न्यूज सुपरफास्ट

बुधवार दि. १६ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

कुकसा लघु प्रकल्पात १८ टक्के जलसाठा; विभागाने घेतल्या नोटा...

समृद्धी महामार्गाला पाणी उपसण्याचा दिला वाटा.

विशेष म्हणजे, हे भगदाड मागील वर्षभरापासून असल्याचा दावा स्थानिकांकडून केला जात आहे. मात्र संबंधित विभागाने अद्याप त्याची ठोस दुरुस्ती केली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह वाढल्यास या भगदाडाचा परिणाम गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**उन्हाळ्यात नवीन भिंत बांधली; मग भगदाड का दिसले नाही?**

संतापाची बाब म्हणजे, याच सांडव्याच्या परिसरात उन्हाळ्यात नव्याने भिंतीचे काम करण्यात आले. मग त्याच वेळी सांडव्याच्या जुन्या भिंतीला पडलेले एवढे मोठे भगदाड संबंधित विभागाच्या निदर्शनास आले नाही का? असा सवाल आता शेतकरी उपस्थित करत आहेत.नवीन बांधकामासाठी यंत्रणा सक्रिय; मात्र जुन्या भिंतीतील भगदाडाकडे दुर्लक्ष का? असा थेट प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.

**पावसाळ्यात धोका वाढल्यास जबाबदार कोण?**

गतवर्षी पावसाचे प्रमाण तुलनेने कमी राहिल्याने या भगदाडामुळे मोठी समस्या निर्माण झाली नाही. मात्र आगामी काळात मुसळधार पाऊस झाला आणि सांडव्यावर पाण्याचा दबाव वाढला, तर या भगदाडाची स्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.धरणाच्या संरचनेला धोका निर्माण झाल्यास परिसरातील शेती, रस्ते, मालमत्ता आणि नागरिकांच्या सुरक्षिततेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे दुर्घटना घडण्याची वाट पाहण्याऐवजी प्रशासनाने आताच तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी असताना मागील वर्षभरापासून भगदाडाकडे दुर्लक्ष कसे झाले? त्याची पाहणी कोणी केली? पाहणी अहवालात भगदाडाची नोंद आहे का? दुरुस्तीचा प्रस्ताव तयार करण्यात आला का? निधी उपलब्ध झाला का? आणि तरीही काम का झाले नाही? या सर्व प्रश्नांची उत्तरे संबंधित विभागाने द्यावीत, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.कुकसा धरणाच्या सांडव्याच्या भिंतीची तांत्रिक व संरचनात्मक पाहणी (ऐैल्र्ूर्ल्ेत घ्हेजमूदह) करून भगदाडाचे नेमके कारण शोधावे, त्याची तातडीने दुरुस्ती करावी आणि भविष्यात अशा प्रकारची समस्या निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

धरणाच्या भिंतीला भगदाड पडूनही वर्षभर दुर्लक्ष होत असेल, तर उद्या मोठी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? हा प्रश्न आता कुकसा परिसरातील नागरिक प्रशासनासमोर उपस्थित करत आहेत

## गणेशोत्सवातून शासकीय योजनांचा लोकसंवाद

### १७ सप्टेंबर रोजी मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळात आरोग्य विभागाच्या विविध योजनांची माहिती

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला असून, या उत्सवाच्या माध्यमातून शासनाचे धोरणात्मक निर्णय आणि विविध महत्त्वाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या सहकार्याने जिल्हा माहिती कार्यालय, वाशिमच्या वतीने विविध विषयांवर जनजागृती करण्यात येणार आहे.या उपक्रमांतर्गत १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७.३० ते ८ च्या दरम्यान मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळ, मंत्री पार्क, वाशिम येथे आरोग्य विभागाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात येणार आहे. या जनजागृती उपक्रमासाठी आरोग्य विभाग, वाशिम सहभागी राहणार आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधत शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि निर्णयांची माहिती पोहोचविणे, तसेच उपलब्ध शासकीय सुविधांबाबत नागरिकांना जागरूक करणे, हा 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाचा उद्देश आहे. या उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

७

गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# महाराष्ट्र शासनाने आणलेला कोचिंग सेंटरचा अन्यायकारक काळा कायदा रद्द करावा

## राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांचे शिक्षण आयुक्त यांना निवेदन

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**खामगाव :** महाराष्ट्र खाजगी शिक्षण नोंदणी अधिनियम २०२६ शासनाने आणलेला हा काळा कायदा म्हणजे गोरगरीब शेतकरी आणि कष्टकरी मुलांचे भवितव्य कायमचे अंधारात ढकलणारा असल्याने तो रद्द करावा तसेच याबाबत फेरविचार करावा अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे

सदर निवेदनात नमूद आहे की, महाराष्ट्र शासनाने कोचिंग सेंटर कायदा २०२६ च्या नावाखाली काढलेला फतवा काढला आहे. तो म्हणजे गोरगरीब सामान्य कुटुंबातील मुलांचे स्वप्नाचा केलेला गळाघोट आहे. शासकीय सरकारी शाळांची दुव्यवस्था झालेली असतांना आपल्या कष्टकरी मुलांची स्पर्धा परीक्षेत टिकावीत, अधिकारी बनावीत म्हणून कोचिंगचा आधार घेत होती. पण राज्य सरकारने १३ वर्षाखालील मुलांवर कोचिंग क्लासमध्ये शिकवणीवर बंदी घालण्याचा जो नियम लागू केला आहे. की त्यांना गरीबांची मुले पुढे गेलेली सहन होत नाही. श्रीमंताची मुले महागड्या खाजगी शाळांच्या आणि गोरगरीबांची मुले शिक्षणापासून वंचित राहतील हा गोरगरीबांवर केलेला थेट अन्याय आहे. हा अन्यायकारक आणि हुकुमशाही कायदा तात्काळ रद्द करावा. जर शासनाने आपली शेतकरी शेतमजूर विरोधी भुमिका बदलली नाही तर राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने तिव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल. आणि जनआक्रोषाला शासनाला सामोरे जावे लागू शकते. एकीकडे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या जोरावर विदेशात जावून बॅरीस्टर पदवी मिळविली आणि भारताचे संविधान लिहीले. असे असतांना महाराष्ट्र शासनाच्या या कायद्यामुळे गोरगरीबांची मुले पदवीधर होणार नाही. कारण असे की, प्राथमिक शालेय परीक्षेमध्ये नवोदय परीक्षेसारख्या महत्वपूर्ण परीक्षा या इयत्ता ४ थी मध्ये व ७ वी मध्ये घेण्यात येतात.

यावेळी विद्यार्थ्यांचे वय हे १३ वर्षापेक्षा कमी असते. महाराष्ट्र शासनाच्या नविन कायद्यानुसार १३ वर्षा पेक्षा कमी मुलांना कोचिंग क्लास मध्ये प्रवेश मिळणार नाही. त्यामुळे ही मुले शिक्षणापासून वंचित राहतील. महाराष्ट्र खाजगी कोचिंग सेंटर नोंदणी आणि नियमन विधेयक २०२६ हा अन्याय मागचा मुख्य कारण शासनानाकडून देण्यात आले आहे की, निट युजी २०२६ च्या पार्श्वभूमीवर अटक करण्यात आलेल्या आरोंपापैकी १३ पैकी ९ आरोपी हे महाराष्ट्रातले आहेत वास्तविक पाहता निट सारख्या महत्वपूर्ण परीक्षेबाबत संपूर्ण शासनाच्या अधिपत्याखाली घेण्यात येते मग पेपर फुटीस कोचिंग क्लासेसचे कसे काय जबाबदार आहेत असा प्रश्न सर्वसामान्य जनतेस पडतो.



» सदर निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, शिक्षणमंत्री दादा भुसे, विरोधी पक्ष नेता विजय वडेट्टीवार, पालकमंत्री, बुलढाणा जिल्हा, जिल्हाधिकारी बुलढाणा, उपविभागीय अधिकारी साहेब, खामगांव, डॉ. बबनराव तायवाडे साहेब, राष्ट्रीय अध्यक्ष ओबीसी महासंघ, शिक्षणाधिकारी माध्यमिक /प्राथमिक बुलढाणा यांना पाठविण्यात आल्या आहेत.

**गणेशभाऊ चौकसे**

त्यामुळे महाराष्ट्र खासगी कोचिंग सेंटर कायदा अधिनियम २०२६ ला विरोध, २५ पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या प्रत्येक कोचिंग सेंटरला हा कायदा लागू करण्यास विरोध, हाच कायदा जर ५ राज्यामध्ये आहे त्यापैकी राजस्थान मध्ये १०० आसाम मध्ये ५० पेक्षा जास्त विद्यार्थी असल्यास लागू होतो. मग महाराष्ट्रात फक्त ३० मुलांच्या छोटया क्लासवर का लादण्यात येत आहे. बेसमेंट आणि तळमजल्यावर कोचिंग सेंटर असण्यावर पूर्णतः बंदी. कोण शिकवणी घेऊ शकत नाही ज्याच्या विरुध्द दखल पात्र गुन्हे आहेतकोचिंगच्या शुल्कावर जाहीर केलेल्या फी पेक्षा जास्त फी घेण्यात येणार नाही हयाची काळजी घ्यावी. पोस्को (क्कह्रष्टस्ह्र) कायदा किंवा लैंगीक शोषणाची तक्रार आली तर २४ तासाच्या आत कार्यवाही करावी. सदर अधिनियमामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये सरकार विरोधी तिव्र भावना निर्माण होत आहे.तरी आपल्या या अधिनियमाचा राष्ट्रीय ओबीसीस महासंघाच्या वतीने तिव्र निषेध करण्यात येत आहे असेही बुलढाणा जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी निवेदनात स्पष्ट नमूद केले आहे.

# मलकापूर, नांदुरा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विजेच्या समस्या प्रकरणी शिवसेना (उबाठा) आक्रमक

## कार्यकारी अभियंता तायडे यांच्या दालनात ठिय्या आंदोलन

प्रतिनिधी १७ सप्टेंबर



**मलकापुर :** मलकापुर व नांदुरा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या म.रा.वि.वि कंपनी संदर्भात विविध तक्रारी असून कंपनी शेतकऱ्यांच्या तक्रारी कडे कानाडोळा करीत असल्याने शेतकऱ्यांना विहिरीत पाणी उपलब्ध असून पिकांना देता येत नाही, शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे आज दिनांक १६ सप्टेंबर रोजी नांदुरा व मलकापूर तालुक्यातील शंभर ते दीडशे शेतकऱ्यांना सोबत घेऊन शिवसेना सह संपर्कप्रमुख वसंतराव भोजने, शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन यांनी म.रा.वि.वि कंपनी कार्यालयावर धडक दिली. कार्यकारी अभियंता आर.जी तायडे अमरावती येथील रुग्णालयात आय सी यु मध्ये दाखल असल्याने कनिष्ठ अभियंता ढोले यांनी शिवसेनेच्या पदाधिकारी व शेतकऱ्यांचा रुद्रावतार पाहून तात्काळ संबंधित ठेकेदार,लाईनमन यांचेशी भ्रमणध्वनीवरून चर्चा करून अर्ध्या समस्या तात्काळ मार्गी लावल्या त्यामध्ये प्रामुख्याने नांदुरा तालुक्यातील गोसींग येथील कमळनाथ रस्त्यावरील डी.पी शंभर के.व्ही ची असून या डी.पी वर लोड येवून वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने शेतकऱ्यांना शेतातील पिकांना पाणी देता येत नसल्याने पिके सुकून जात असल्याचे सांगितल्याने या डीपीवर "निरंतर योजनेअंतर्गत" त्या डीपीच्या बाजूलाच दुसरी डीपी बसवण्याचा प्रस्ताव तात्काळ मंजूर करण्यात आला,गोसींग येथील जुनी गावठाण डि.पी, विटाळी तालुका नांदुरा येथील शत्रुघन क्षीरसागर यांच्या शेतातील डी.पी चे अंतर चार किलोमीटर चे असून सदरची डीपी १६ केव्हीची असल्याने या डीपी वरती शेतकऱ्यांचे विद्युत पंप चालत नाही त्या ठिकाणी शंभर केव्हीची डीपी बसविण्याची मागणी निरंतर योजने अंतर्गत पूर्ण होईल, मलकापूर तालुक्यातील दुधलगांव येथील अजय लहू झनके, बळीराम बावस्कार, प्रल्हाद नारखेडे, पुरुषोत्तम नारखेडे, निनू लक्ष्मण पाटील यांच्या गट नंबर ३१४, ३१५, ३१६, या शेतातील वीस पोल वरील तीन किलोमीटरच्या परिसरातील विद्युत तार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले ते तारे तात्काळ बसून शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या, सावरगाव नेहू येथील माणिक सुरेश सुळे यांच्या शेतातील तार शिफ्टिंग, मलकापूर तालुक्यातील निंबारी येथील वसंत वराडे यांच्या शेतातील ६३ के व्ही ची डीपी बदलून १०० के.व्ही, कुंड खुर्द येथील म्हाडा डि.पी वरील पोल झुकले तसेच शेंबा येथील नवाब डि.पी मेंन्टन्स मधून तात्काळ पोल सरळ करून विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात ठेकेदाराला सूचना देण्यात आल्या, मलकापुर तालुक्यातील वाघोळा येथील गिल डीपी वरील ज्ञानदेव अहिर, अंबादास पाटील, गणेश अहिर, योगिता म्हस्कादे आदी शेतकऱ्यांच्या शेतातील १५ पोल वरील विद्युत तारा चोरट्यांनी लंपास केल्या असून त्या तारा ही तात्काळ ओढण्यात याव्यात, पंतनगर मधील रिजवाना परवीन शेख करीम यांच्या खाजगी प्लॉटमधून गेलेली विद्युत तार तात्काळ हटविण्यासंदर्भात या व इतर मागण्यांसाठी या आंदोलन करण्यात आले यावेळी युवा सेना तालुकाप्रमुख पवन गरुड, अल्पसंख्यांक सेना उपजिल्हाप्रमुख सै. वसीम सै.रहीम, वाहतूक सेना शहर प्रमुख इमरान लकी, विजय झांबरे, अनिल भारसाकळे, दत्तात्रय भारसाकळे, संतोष भारसाकळे, अनंता अंबुसकर, संजय राजपूत, आनंदा क्षीरसागर, विजय सिंग बिल्लारे, समाधान शिंदे, राहुल सुरडकर, अजय जाट, केसरसिंग जाट, बद्रीनाथ धोत्री, विष्णू भारसाकळे, रवी सुरळकर, भारत सुरडकर, अमरसिंग सोळंके, शेख हारून, गोपाल भागवत, शिवहरी गवळी, गजानन बावणे, पुंजाजी भोपळे, विजय सुरडकर, केसर सिंग जाट,दुधलगाव येथील अजय लहू झनके, निनू लक्ष्मण पाटील, शेंबा येथील प्रमोद उत्तम दिवनाले, किशोर वराडे, रफीकभाई पजायेवाले सह नांदुरा व मलकापूर तालुक्यातील असंख्य शेतकरी उपस्थित होते.

# मलकापुरात घरगुती वादातून तरुणाचा चाकूने प्राणघातक हल्ला

## महिलांसह तिघे गंभीर जखमी, उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांची भेट

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**मलकापूर :** शहरातील सुभाषचंद्र बोस नगरात घरगुती कारणावरून वाद होऊन एका तरुणाने हातात चाकू घेऊन घरात घुसून तीन जणांवर प्राणघातक हल्ला केल्याची सनसनाटी घटना १५ सप्टेंबरच्या रात्री सव्वादहा वाजेच्या सुमारास घडली. या हल्ल्यात दोन महिलांसह एक पुरुष गंभीर जखमी झाला असून, त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात आरोपी तरुणाविरोधात जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी (अटेम्प्ट टू मर्डर) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लक्ष्मी प्रकाश रावणचवरे (वय २३, रा. सुभाषचंद्र बोस नगर) या आपल्या बहिणीसह घरी हजर असताना, आरोपी आकाश साहेबराव रावणचवरे (रा. बहापुरा) हा हातात चाकू घेऊन अचानक घरात घुसला.

ृतू माझ्या घरातून सर्व सामान घेऊन निघून का गेली नाहीस?ज् असा जाब विचारत आकाशने लक्ष्मी यांच्या उजव्या छातीवर जिवे मारण्याच्या उद्देशाने चाकूने जोरदार वार केला. यावेळी मध्यस्थी करायला आलेल्या त्यांच्या बहिणीवरही चाकूने हल्ला करून तिच्या हाताची दोन बोटे कापली.

दरम्यान, लक्ष्मी यांचे भाऊजी सतीश वऱ्हाडे हे सोडवण्यासाठी धावून आले असता आरोपीने त्यांच्या डाव्या कुशीत पोटावर चाकू खुपसून गंभीर जखमी केले आणि सर्वांना जिवे मारण्याची धमकी दिली. घटना घडताच परिसरात खळबळ उडाली. उपविभागीय पोलीस अधिकारी सोहन माछरे, शहर पोलीस निरीक्षक गणेश गिरी व पोलीस उपनिरीक्षक कुणाल जाधव यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी घटनास्थळावरून गुन्ह्यात वापरलेला चाकू जप्त केला आहे. लक्ष्मी रावणचवरे यांच्या तक्रारीवरून आरोपी आकाश रावणचवरे याच्याविरोधात बीएनएस कलम १०९(१), ३३३, ३५१(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणे अंमलदार रूपेश झाल्टे यांनी गुन्ह्याची नोंद केली असून, पोउपनि कुणाल जाधव पुढील तपास करत आहेत.

# अज्ञात मालवाहू वाहनाची दुचाकीला धडकेत एकाचा मृत्यू

## पारखेड फाट्याजवळील घटना गुन्हा दाखल

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**खामगाव :** पारखेड फाट्याजवळ भरधाव व निष्काळजीने मालवाहू वाहन चालवून दुचाकीला जोरदार धडक दिल्याची घटना १६ सप्टेंबर रोजी दुपारी सव्वाबारा वाजताच्या सुमारास घडली. या अपघातात दुचाकीस्वार मधुकर श्रीकृष्ण घनोकार (५०, रा. बेलुरा, ता. नांदुरा) यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मधुकर घनोकार हे दुचाकीने जात असताना पारखेड फाट्याजवळ चुकीच्या दिशेने येणाऱ्या एका मालवाहू वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यांचा मृत्यू झाला असून, दुचाकीचेही नुकसान झाले. या प्रकरणी मृतकाचे भाऊ सुधाकर श्रीकृष्ण घनोकार (५३, रा. बेलुरा, ह.मु. नांदुरा) यांनी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून वाहनचालक दिनेश मनसुखभाई भालोडी (रा. आरोडी, ता. कोटडा संगानी, जि. राजकोट, गुजरात) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६ (१), २८१, ३२४(४) व ३२४ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास किरण राऊत करीत आहेत.

# मलकापूरच्या सुभाषचंद्र बोस नगरात तरुणाला हतोड्याने मारहाण

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**मलकापूर :** नातेवाईकांकडे गेलेल्या एका तरुणाला 'तू इथून निघून जा' असे म्हणत डोक्यावर हतोड्याने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना शहरात समोर आली आहे. सुभाषचंद्र बोस नगरात १५ सप्टेंबरच्या रात्री सव्वादहा वाजेच्या सुमारास ही हिंसक घटना घडली. या प्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात एका महिला आरोपीसह तिघांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश साहेबराव रावणचवरे (वय २७, रा. बहापुरा, मलकापूर) हे १५ सप्टेंबरच्या रात्री त्यांच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी सुभाषचंद्र बोस नगरात गेले होते. ते तेथे पोहोचले असता, आरोपी लक्ष्मी प्रकाश रावणचवरे हिने त्यांना 'तू इथून निघून जा' असे म्हणत वाद घालण्यास सुरुवात केली. या वादातून चिडलेल्या रुपाली सतीश वऱ्हाडे हिने तिच्या हातातील हतोड्याने थेट आकाश यांच्या डोक्यावर प्रहार करून त्यांना रक्ताळले. त्याचवेळी लक्ष्मी रावणचवरे व सतीश वऱ्हाडे या दोघांनी आकाश यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करत अश्लील शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. या प्राणघेण्या हल्ल्यात जखमी झालेल्या आकाश रावणचवरे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी रुपाली वऱ्हाडे, लक्ष्मी रावणचवरे आणि सतीश वऱ्हाडे (सर्व रा. सुभाषचंद्र बोस नगर, मलकापूर) यांच्याविरोधात बीएनएस कलम ११८(१), ३५२, ३५१(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल केला आहे. ठाणे अंमलदार रूपेश झाल्टे यांनी या गुन्ह्याची नोंद केली असून, पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कुणाल जाधव या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

**महिलांसह तिघांवर गुन्हा दाखल**

# विजेचा धक्का; पळशी सुपो येथे तरुणाचा, तर सावळा-शेवगा येथे शेतकऱ्याचा मृत्यू

## विद्युत सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**जळगाव जामोद/संग्रामपूर :** वेगवेगळ्या ठिकाणी विजेच्या धक्क्याने दोघांचा मृत्यू झाल्याच्या घटना बुधवारी समोर आल्या आहेत. जळगाव जामोद तालुक्यातील पळशी सुपो येथे सार्वजनिक विहिरीवरील विद्युत बोर्डात मोटारीची वायर जोडताना बादल जगदेव अंभोरे (२७) यांचा मृत्यू झाला, तर संग्रामपूर तालुक्यात सावळा-शेवगा (शेतखेडा) रस्त्यावर पडलेल्या विद्युत तारांचा धक्का लागून शेतकरी सुभाष जाधव (४६) यांचा मृत्यू झाला. पळशी सुपो येथे १६ सप्टेंबर रोजी दपारी साडेबारा वाजताच्या समारास बादल अंभोरे हे घराजवळील सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यासाठी मोटार सुरू करण्याच्या तयारीत होते. त्यांनी घरातून वायर विहिरीपर्यंत नेली होती. विहिरीवरील विद्युत बोर्डाच्या प्लगमध्ये वायर जोडत असताना त्यांना अचानक विजेचा जोरदार धक्का बसला. यामुळे ते बोर्डापासून दूर फेकले गेले. घटनेनंतर त्यांच्या आईसह गावातील नागरिकांनी त्यांना ऑटोरिक्षातून जळगाव जामोद ग्रामीण रुग्णालयात आणले; मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असन तपास तयब अली करीत आहेत

**रस्त्यावर पडलेल्या तारांचा सुभाष जाधव यांना धक्का !**

संग्रामपूर तालुक्यातील सावळा-शेवगा (शेतखेडा) रस्त्यावर विद्युत तारांवर झाड पडल्याने काही तार अर्धवट लटकलेल्या, तर काही तार रस्त्यावर पडलेल्या अवस्थेत होत्या. सुभाष जाधव हे शेतात जात असताना या विद्युत तारांचा धक्का लागून त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्याकडे सुमारे अडीच एकर शेती होती. शेतीच्या माध्यमातून ते कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या अचानक मृत्यूने जाधव कुटुंबावर मोठे संकट ओढवले असून, ग्रामस्थांकडून हळहळ व्यक्त होत आहे.

# गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुकीचा क्रम ड्रॉद्वारे निश्चित!

## लहान बालकांच्या हस्ते चिठ्या; पोलिसांकडून नियोजन

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**खामगाव :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर खामगाव शहरातील गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुकीचे नियोजन करण्यासाठी पोलिस प्रशासनाने लकी ड्रॉ पद्धतीचा अवलंब केला.

लहान बालकांच्या हस्ते चिठ्ठया काढून शहर पोलिस स्टेशनमध्ये बुधवारी २८ गणेश मंडळांचा मिरवणुकीतील क्रम निश्चित करण्यात आला. या पद्धतीमुळे मिरवणुकीच्या क्रमावरून निर्माण होणारे संभाव्य वाद टाळण्यासह विसर्जन सोहळा शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यास मदत होणार आहे.

यावेळी अपर पोलिस अधिकारी पियूष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील, पोलिस निरीक्षक सुरेंद्र अहीरकर, ठाणेदार मंदार प्ररी उपस्थित होते, पोलिस प्रशासनाने मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधत विसर्जन मिरवणुकीच्या नियोजनाबाबत चर्चा केली. लकी ड्रॉमध्ये मानाचा लाकडी गणपती (अय्याची कोठी) याला पहिला क्रमांक मिळाला. त्यानंतर तानाजी गणेश मंडळ, हनुमान गणेश मंडळ, राणा गणेश मंडळ, वंदेमातरम् गणेश मंडळ, आदर्श गणेश मंडळ, स्वामी विवेकानंद गणेश मंडळ, जय संतोषी माँ गणेश मंडळ, बजरंग दल गणेश मंडळ आणि माँ आत्मशक्ती गणेश मंडळ यांचा क्रम निश्चित करण्यात आला. त्यानंतर दत्तगुरू, वीर हनुमान, रामदल, जगदंबा, तेलगूराज, चंदनशेष, जय गजानन, नेताजी, मृत्युंजय, श्रीकृष्ण, क्रांती, एकता, अमरलक्ष्मी, सिंधी नवयुवक, त्रिशूल, सराफा, जय भवानी आणि राष्ट्रीय गणेश मंडळांचा अनुक्रम निश्चित करण्यात आला.

# चाळीस दिवसांपासून पावसाची दडी; शेतकरी संकटात!

## जळगाव जामोद, संग्रामपूर व शेगाव तालुका तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करा

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**जळगांव जामोद :** जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघासह बुलडाणा जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी झाल्याने खरीप हंगाम अक्षरश धोक्यात आला आहे. गेल्या चाळीस दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतातील पिके करपण्याच्या मार्गावर असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन जळगाव जामोद, संग्रामपूर व शेगाव तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, या मागणीसाठी जळगाव (जामोद) तालुका काँग्रेस कमिटी व शेतकरी बांधवांच्या वतीने बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी मतदारसंघाचे आमदार डॉ. संजय कुटे यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

पावसाअभावी खरीप पिकांची अवस्था अत्यंत गंभीर झाली आहे. शेतकऱ्यांनी बियाणे, खते, कीटकनाशके, औषधे तसेच मशागतीसाठी मोठा खर्च केला; मात्र पिकांना आवश्यक वेळी पाऊस न मिळाल्याने हा संपूर्ण खर्च वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता उत्पन्न नाही आणि कर्जाचा डोंगर मात्र कायम, अशी भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे.

**दुष्काळ जाहीर करून पंचनामे तातडीने करा**

जळगाव जामोद, संग्रामपूर व शेगाव तालुक्यातील प्रत्येक गावात शेतपिकांची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. केवळ कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष शेतात जाऊन परिस्थितीची पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, अशी मागणी करण्यात आली.

**हेक्टरी ५० हजारांची तातडीची मदत द्या**



दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीची मदत द्यावी, पिकांच्या नुकसानीची भरपाई मंजूर करून ती तत्काळ वितरित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांचे वीजबिल माफ अथवा त्यात सवलत देऊन वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, अशीही मागणी करण्यात आली.

पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांसाठी पाण्याची व्यवस्था करावी. जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात किंवा पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

**कर्जवसुलीला स्थगिती देण्याची मागणी**

दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कटली असून, अशा परिस्थितीत कर्जवसुलीचा तगादा लावू नये. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या कर्जवसुलीस स्थगिती देऊन आवश्यक आर्थिक मदत द्यावी, शासनाच्या दुष्काळी निकषानुसार मिळणाऱ्या सर्व सवलती व योजनांचा तातडीने लाभ द्यावा, तसेच दुष्काळग्रस्त भागासाठी विशेष मदत पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी हे आंदोलन शांततामय व लोकशाही मार्गाने करण्यात आले असून, शासनाने या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

**पोलीसांचा तगडा बंदोबस्त**

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जळगाव जामोद पोलीस पोलीस निरीक्षक सचिन बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

यावेळी काँग्रेस पक्षनेत्या स्वाती वाकेकर, रामविजय बुरुंगले,पंचायत राजचे प्रदेशाध्यक्ष अविनाश उमरकर, जिल्हा अध्यक्ष कांग्रेस कमिटी विचार विभाग अजय राजपुत शैलेंद्र पाटील,तालुकाध्यक्ष ॲड. भाऊराव भालेराव, प्रकाश बाप्पू देशमुख,तेजरावभाऊ मारोडे, पाटील करमोडा,कलदार पाटील शेख नासीर, शहराध्यक्ष अमर पाचपोर, ज्ञानेश्वर शेजोळे, प्रमोद पाटील, श्याम पालीवाल, सतीश टाकळकर, जुबेर पटेल, जुनेद शेख, वैभव सारोकार, अजहर देशमुख, अंबादास बाठे, ॲड. रतन इंगळे, डॉ. शाकीर, डॉ.प्रशांत राजपूत, अर्जुन घोलप, कैलास बोडखे, तुकाराम गटमणे पाटील, विनोद भिवटे, प्रकाश साबे,प्रमोद गोळे, सय्यद अफ्रोज, अर्शद जमदार यांच्यासह शेकडो काँग्रेस कार्यकर्ते, तालुका काँग्रेस समितीचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पावसाने पाठ फिरवली, पिके संकटात आली आणि शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची वेळ आली आहे. त्यामुळे आता आश्वासन नव्हे, तर तातडीची मदत आणि ठोस निर्णयाची गरज आहे. शासनाने विलंब न करता जळगाव जामोद, संग्रामपूर व शेगाव तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.




# महाबीज बियाण्यांच्या 255 तक्रारी पैकी 134 तक्रारींमध्ये तथ्य, 234 हेक्टर क्षेत्र बाधित

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अकोला :** महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या सोयाबीन बियाण्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्ह्यात महाबीजच्या सोयाबीन बियाण्यांची उगवण झाली नसल्याच्या २५५ तक्रारी कृषी विभागाला प्राप्त झाल्या असून, त्यापैकी १३४ तक्रारींमध्ये तथ्य आढळून आले आहे. या प्रकरणांमध्ये २३४ हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.




यंदा उशिराने झालेल्या मॉन्सूनमुळे खरीप हंगामातील पेरण्या आधीच लांबल्या. त्यातच अनेक भागांत पेरलेले सोयाबीन बियाणे उगवले नसल्याने शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले. बियाणे, खते आणि मशागतीसाठी पुन्हा खर्च करावा लागल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी वाढल्या.१४ ऑगस्टपर्यंतच्या कृषी विभागाच्या तपासणी अहवालानुसार, जिल्ह्यात निकृष्ट बियाण्यांसंदर्भात एकूण १० हजार ४८५ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी ९ हजार ९९४ तक्रारींमध्ये तथ्य आढळून आले असून, १५ हजार ५६० हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याचे अहवालातून समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर महाबीजच्या बियाण्यांबाबत समोर आलेली आकडेवारी अधिक गंभीर ठरते. महाबीजकडे स्वतःची बियाणे गुणवत्ता तपासणी तसेच प्रमाणीकरणाची यंत्रणा असतानाही २५५ तक्रारी प्राप्त होणे आणि त्यापैकी १३४ तक्रारी तथ्यपूर्ण ठरणे, यामुळे बियाण्यांच्या गुणवत्ता नियंत्रणाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

### केवळ मार्केटिंगवर भर?

महाबीजच्या बियाण्यांवर विश्वास ठेवून पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांचे बियाणे उगवले नाही, तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची? गुणवत्ता तपासणी आणि प्रमाणीकरणाची यंत्रणा असतानाही सदोष बियाणे शेतकऱ्यांपर्यंत कसे पोहोचले? या प्रश्नांची उत्तरे कृषी विभाग आणि महाबीजकडून अपेक्षित आहेत. दरम्यान, ओसवाल, रवी, बूस्टर आदी कंपन्यांच्या बियाण्यांबाबतही तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कृषी विभागाने चौकशी केली. असून, एका कंपनीवर जिल्ह्यात बंदी घालण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, शासनाच्या मालकीच्या महाबीजच्या बियाण्यांबाबतही तक्रारी तथ्यपूर्ण ठरत असल्याने या प्रकरणाची स्वतंत्र आणि सखोल चौकशी करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

## शिक्षकांना 'कृतिशील शिक्षक' पुरस्कार



प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अकोला:** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, प्राथमिक विभाग, जिल्हा शाखेच्या वतीने १३ सप्टेंबर रोजी आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालयात जिल्ह्यातील केजी ते पीजी स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा 'कृतिशील शिक्षक पुरस्कार' तसेच अध्यापनाच्या कार्यासोबतच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देऊन शिक्षकी पेशाची मान उंचावणाऱ्या शिक्षकांना 'शिक्षकरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार सोहळ्याचे अध्यक्षस्थान बीजीई सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मोतिसिंह मोहता यांनी भूषविले. पुरस्कार वितरण माजी राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला माजी आमदार वसंतराव खोटरे, माजी आमदार नारायण गव्हाणकर, शिक्षणाधिकारी प्राथमिक रतनसिंग पवार, शिक्षणाधिकारी माध्यमिक अरविंद मोहरे, बीजीई सोसायटीचे मानद सचिव पवन माहेश्वरी, डॉ. अपर्णा पाटील, डॉ. राजेश चंद्रवंशी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यात यापूर्वी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुकळी (पं. स. बार्शीटकळी) येथील सहाय्यक अध्यापिका सौ. सुषमा संजय चव्हाण यांना 'कृतिशील शिक्षक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## मेळघाट धारणी मध्ये बांधकाम उपअभियंता एलसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**धारणी:** मेळघाटमध्ये धारणी तालुक्यातील एल सी बी च्या कामाची चांगलीच धडक मोहीम सुरु झाल्याचे दिसत आहे, सहदुय्यम निबंधक कार्यालय धारणी ची मोठी कारवाई तीन सप्टेंबर रोजी करण्यात आली होती.तेथून चौदा दिवसांनी पुन्हा अश्याच प्रकारच्या कार्यवाहीचा उजाळा एल सी बी नी केला, ते म्हणजे तक्रारदार हे बांधकाम कंत्राटदार व बिल्डिंग मटेरियल सप्लायर असून त्यांनी सन २४/२५ व २५/२६या आर्थिक वर्षात सार्वजनिक बांधकाम उपविभाग धारणी महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत धारणी तालुक्यातील काही गावातील सिमेंट काँक्रिट रस्त्यावर साहित्य पुरवठा व बांधकाम केले आहे.

त्यापैकी अंदाजे दीड कोटी रुपयांचे कामाचे देयक त्यांना माहे मार्च २०२६ मध्ये प्राप्त झाले असुन अंदाजे अंशी लक्ष रुपयाचे देयक मिळणे बाकी आहे. सदर कामापैकी तक्रारदार यांना माहे मार्च २०२६ मध्ये अंदाजे दीड कोटी रुपयाचे देयक काढून दिल्याचा मोबदला म्हणून आरोपी लोकसेवक विनोद मकरध्वज नवघरे सहाय्यक अभियंता, श्रेणी १, सार्वजनिक बांधकाम उप विभाग धारणी जी अमरावती यांनी ७ टक्के प्रमाणे १०,५०००/रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार दिली. तडजोडी अंती नऊ लाख रुपये लाच घेण्याचे मान्य केले. व त्यापैकी पहिला टप्पा म्हणून दोन लाख रुपये तक्रार दार यांच्याकडून स्वीकारणार असे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले. दिनांक १६ सप्टेंबर रोजी २० .५३ वा.ते २१.१६ वा यादरम्यान करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही वेळी दरम्यान तक्रारदार यांच्या कडून पंच्यासमक्ष आरोपी लोकसेवक विनोद मकरध्वज नवघरे सहाय्यक अभियंता यांनी तक्रारदार यांच्याकडे मागणी केलेल्या लाच रकमेपैकी पहिला टप्पा म्हणून दोन लाख लाच रक्कम तक्रारदार यांच्याकडून स्वतः करिता त्यांच्या शासकीय निवासस्थानी लाच रक्कम स्विकारताना आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

## खदान परिसरात चाकू हल्ल्यात दोन युवक जखमी

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अकोला:** खदान परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान चाकूबाजीत झाले. दोन्ही बाजूंनी चाकू चालवल्याने या घटनेत दोन युवक जखमी झाले आहेत. दोन्ही जखमींना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, खदान परिसरात कोणत्यातरी कारणावरून दोन युवकांमध्ये शाब्दिक वाद झाला. पाहता पाहता हा वाद वाढत गेला आणि दोन्ही बाजूंनी एकमेकांवर चाकूने हल्ला करण्यात आला. या घटनेत दोन्ही युवक जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी खदान पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, घटनेचे नेमके कारण तसेच वादात सहभागी असलेल्या व्यक्तींची माहिती घेऊन पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

## गणेशोत्सवासाठी प्रशासन सज्ज... विसर्जनासाठी गणेश घाट सजले

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

अकोला: शहरात गणेशोत्सव मोठ्या थाटात साजरा होत आहे नुकतेच दीड दिवसाच्या गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. गणेशोत्सवा आधीच शहरातील महापालिकेचे तीन मुख्य गणेश घाट तयार करण्यात आहे. सर्वात जास्त गर्दी सिटी कोतवाली जवळील गणेश घाटावर होत असते हे पाहता या गणेश घाटाचे सौंदर्यीकरण नुकतेच करण्यात आले आहे. ज्या नागरिकांनी दीड दिवसाच्या गणपती बाप्पाची स्थापना केली होती त्या नागरिकांनी सिटी कोतवाली जवळील गणेश घाटावर गणेशाचे विसर्जन केले.



### प्रशासनाने केली विसर्जन मार्गाची पाहणी

गणेश विसर्जना आधी विसर्जन मार्गावरील सर्व बाधा दूर करण्यासाठी पोलीस आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी विसर्जन मार्गाची पाहणी केली. उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील तसेच महापालिकेचे अधिकारी यांनी विसर्जन मार्गाचे निरीक्षण करीत विसर्जन मार्गावर खाली आलेल्या इलेक्ट्रिक तारा, अतिक्रमण, तसेच गणेश घाटांचे निरीक्षण करीत गणेश भक्तांना येणाऱ्या सर्व बाधा दूर करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

### शहरातील अन्य विसर्जन घाट व विसर्जन कुंड सज्ज



अकोला शहरात महापालिकेचे तीन विसर्जन घाट आहेत त्यामध्ये सिटी कोतवाली, निमवाडी, तसेच हरिहर पेठ विसर्जन घाटाचा समावेश आहे. तर शहरात अन्य सामाजिक संस्था आणि नागरिकांतर्फे सुद्धा गणेश विसर्जन कुंडाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामध्ये पूर्व झोन मधील भारत विद्यालय, तापडिया नगर , छत्रपती संभाजी गार्डन, सातव चौक, छत्रपती शिवाजी पार्क, राष्ट्रीय शाळा, जुने शहरातील बाबळेश्वर मंडळ, मुरली स्वीट, मार्ट दक्षिण झोन मध्ये केशव नगरातील छत्रपती उद्यान, सिद्धेश्वर घाट, तर उत्तर झोन मध्ये मंगल हॉटेल जवळ विसर्जन कुंडाची व्यवस्था करण्यात आली आहे अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त विजय पारतवार यांनी दिली.

## सर्व विभागांनी सक्रिय सहभागी होऊन 'सेवा संकल्प अभियान' यशस्वी करावे- विभागीय आयुक्त

प्रतिनिधी १७ सप्टेंबर

**अमरावती:** सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहचविण्याच्या उद्देशाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत अमरावती विभागातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगर पालिकांचे आयुक्त यांच्या बरोबरच सर्व विभागांच्या विभागीय, जिल्हा व तालुका स्तरीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभागी होऊन अमरावती विभागात 'सेवा संकल्प अभियान' यशस्वी करावे असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले.




शासन निर्णयानुसार 'सेवा संकल्प अभियानाच्या' अंमलबजावणीसाठी अमरावती विभाग स्तरावर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी व सनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. या समितीच्या बैठकीत विभागीय आयुक्त गुंडे बोलत होत्या समितीचे सदस्य विभागातील जिल्हाधिकारी आशिष येरेकर (अमरावती), श्रीमती वर्षा मिना (अकोला), प्रविण देवरे (बुलडाणा), विकास मिना (यवतमाळ), योगेश कुंभेजकर (वाशिम), जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी (अमरावती) नयन नावंदर (अकोला) गुलाबराव खरात (बुलडाणा) विशाल खत्री (यवतमाळ) अर्पित चव्हाण (वाशिम) महानगरपालिकांचे आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले (अमरावती) सुनिल लहाने (अकोला) या बैठकीस दुरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.








मारवाडी प्रेस गणेशोत्व मंडळ,अकोला



जलाराम गणेश उत्सव मंडळ,अकोला



अर्जुन समाज गणेश उत्सव मंडळ,अकोला



अकोला अर्बन कॉ.बँक कर्मचारी गणेशोत्सव मंडळ



तेलीपुरा गणेशोत्सव मंडळ,अकोला



लालबागचा राजा, एकता गणेश उत्सव मंडळ




प्रदीप गुरुखुद्दे यांच्या विठ्ठल मंदिर जुने शहर जवळील निवासस्थानी विराजमान बाप्पा


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.

■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135